नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



१९४७ :: ★ या अंकांतील लेखक व कवि ★ :: किंमत ८

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी'
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड).

युगवाणी

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता—
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ,
अमरावती (वऱ्हाड).

अनुक्रमणिका

* * *

कविता

१ तूं नाहि मला पाहिलें !—
प्रा. पु. शि. रेगे, बी. एस् सी. २४१
२ इंद्रचाप—
अनंत आटले, बी. ए. २४२
३ रे अनंग !—
प्रा. भ. श्री. पंडित, एम्. ए. २४२
४ दिव्य काननीं—
द. चिं. सोमण २४२
५ श्रीमंती आणि गरिबी—
गो. रा. दोडके, बी. ए. २४३

थोरांचा परिचय

१ यशवंत खुशाल देशपांडे —
ना. ना. हूड, बी. ए., एल् एल्. बी. २४४
२ महादेवी वर्मा—सौ. लीला दुबे, एम्. ए. २४८

प्रबंध

१ केशवसुतांची स्वप्नसृष्टी
श्रीराम अत्तरदे, एम्. ए. २५२
२ आधुनिक कवितेच्या निमित्ताने—
प्रा. पु. शि. रेगे, बी. एस् सी. २५८
३ कवि आणि टीकाकार
व. अ. शहाणे, एम्. ए., एल् एल्. बी. २६१
४ साहित्य आणि संगीत
वि. ज. सहस्रबुद्धे २६३

विविध

१ संपादकीय २६६

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ-साहित्य-संघाचें मुखपत्र

युगवाणी

वर्ष २ रें
अंक ८ वा

: संपादक :
वामन नारायण देशपांडे

ऑगस्ट
१९४७

तूं नाहि मला पाहिलें !

मी माझी शोभा घेउन आलें
तूं नाहि मला पाहिलें

पिंजऱ्यांतले हुकुमी पक्षी
वनराजींची व्याकुळ नक्षी
याच राहिल्या माझ्या साक्षी
तूं नाहि मला हटकलें…
तूं नाहि मला पाहिलें

रंभा मी, उर्वशी, मेनका,
क्लीओपात्रा, रूथ, राधिका,
चंद्रा, बकुळा, कानडि मलिका
पण मीच मला भोगिलें…
तूं नाहि मला पाहिलें

रूप अता हें गोठुन गेलें
सूर हे असे काळवंडले
हीं किडलीं शब्दांचींहि मुळें
रे मीच मला विसरलें…
तूं नाही मला पाहिलें

मी माझी शोभा घेउन आलें
तूं नाहि मला पाहिलें

—पुरुषोत्तम शिवराम रेगे.

* * *

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इंद्रचाप

पहा पहा ग ऽ इंद्रधनूची वरती भव्य कमान् !

धरणीची मनधरणी ऐकुनि
अमृतमय नवजीवन ओतुनि
दिलें घनांनी प्रेमें लावुनि—
उद्धाराचें–उत्कर्षाचें–उज्ज्वल–दिव्य निशाण् !

संसाराच्या या गलक्यांत
तरल कल्पना ज्या विरतात
नयनमनोहर, रम्य, उदात्त—
इंद्रधनूच्या रूपें त्यांचें चित्र उमटलें छान् !

सजल घनांतुन प्रकाश फाकुन
फुलतें हें रंगांचें कंकण —
म्हणो असें विज्ञान म्हणो; पण—
या ज्ञानाने हृदयामधली उचमळते ना तान् !

दिव्य, अलौकिक सौंदर्याला
बघून वाटे जें हृदयाला
भावोत्कट त्या औत्सुक्याला
उकलुन दाविल कधी सखे का मनुजाचें विज्ञान् !

म्हणो कुणी हें स्वप्न फुकाचें,
वास्तव अपुलें जग मुलुखाचें !
मनन करूं चल स्वर्गसुखाचें
भरारताहे कल्पकतेचें वरवरतीच विमान् !

हें अपुलें जग–असार, ओंगळ–
तें वरचें ?–शून्यासम पोकळ–
शून्यनिवासी आपण केवळ
त्या शून्यास्तव, या शून्याचा क्षण विसरूं अभिमान् !

रंगांच्या क्षिति दिसती विलग न
एकपणीं त्या गेल्या मिसळुन
तसेच दोघे जिवलग आपण !
इंद्रधनूसम खुलणें–हसणें–होणें अंतर्धान् !!

—अनन्त आठले

★

रे अनंग !

जाग जाग रे ! अनंग
रुचिर तुझे रंगढंग.

तुजला येतांच जाग
भडके हृदयांत आग
कवळुन ती सर्व भाग—
जाळिपोळि अंग अंग

नयन तुझे लालबुंद
प्रणयाने अंधधुंद,
अधरावर मधुमरंद,
मुखिं अभंग स्मिततरंग

ऊठ ! घे धनुष्यबाण !
साध तुझें ठाणमाण !
मार नेम ! उडव प्राण !
तूं किरात, मी कुरंग.

—भवानीशंकर श्री. पंडित.

★

दिव्य काननीं

दिव्य काननीं दिव्य शारदा !
तेजःसीमा छाया येथ न,
कळीकळीला,
बिंदुबिंदुला तरंगिणींतिल,
कणाकणाला
अत्र पवित्रा आभामयता
तेजोदानें लोकविलक्षण चतुर्थ लोकीं
भव्य शिला नच कला शशीची
वरी सुरेखा कलादेवता
वीणाहस्ता विराजमाना
नादब्रम्हीं ब्रम्हकुमारी
त्रिगुणातीता त्रिगुणनिधाना
ब्रम्हस्वरूपा

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करीत निर्मित शब्दोच्चारें
इये चराचर,
रत्नाकरतल वनभू मंगल
रंगीं मोहक इंद्रधनूंच्या,
नील मण्यांच्या द्रवें वाहिनी
गान विमोहित नील धबधबा
अगदी मौनीं,
हरित विभेच्या रम्य शलाका
लतिका डुलती
झळकत अविरत,
सुमसंभारीं
कितीक कौस्तुभ
कर्णकुंडलें
स्यमंतक किती
नक्षत्रांच्या प्रभाळ माळा
द्युती फाकली अद्‌भुत! अद्‌भुत!!
इये चेतना- स्पंदन नुरलें
देवीचरणीं विनत प्रतिभा
मयूर चंचल
नृत्यविशारद नृत्य विस्मरे!
येथे जडता स्फुरण अलौकिक
उपल होउनी प्रफुल्ल उत्पल
मधुंत बुडाले द्रवूं लागतां!
एकतानता एकरूपता इये एकता
कंकण-गीती अतीव मंजुळ वीणावाणी
मधुर झंकृती कंकणमुक्ता!
काल लागतां समदावाया
नादब्रम्हीं स्वत्व विसरूनी
झाला अगतिक
आणि लाभला निर्मितीस वर
शाश्वततेचा
दिव्य काननीं!!

—द. चिं. सोमण.

★

श्रीमंती आणि गरिबी

श्रीमंती—

पोर खाटेला खिळुन किति दिसांची
आज गेली सोडून एकदाची!
हात भाळीं मारून तात बोले,
"करायाचें सगळेंच अम्ही केलें!
परी अमुच्या भाग्यांत पोर नाही,
देवराया घेऊन तिला जाई!"

आणि गरिबी—

पोर खाटेला खिळुन किति दिसांची
आज गेली सोडून एकदाची!
हात भाळीं मारून बाप बोले,
"तिच्यासाठी कांहीं न अम्ही केलें!
कशाला तूं आलीस याच गेहीं!
झिजत जाउन सुटलीस आज बाई!"

—गो. रा. दोडके

• • •

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यशवंत खुशाल देशपांडे

नारायण नागोराव हूड,
बी.ए., एलएल. बी.

● यवतमाळचे सुप्रसिद्ध संशोधक डॉ. य. खु. देशपांडे यांचा परिचय या लेखांत रा. हूड यांनी करून दिला आहे. शारदाश्रमाच्या कार्यांत रा. रा. द. दामले वकील, यवतमाळ, यांजबरोबरच रा. हूड यांचाहि मोठा वाटा आहे.

* * *

"थांबा! मी तुम्हाला मराठीमधील अहवालाची एक प्रत आणून देतों, हं!"-हिंगण्याचे वुइमेन्स कॉलेजमधील एक प्राध्यापक एका व्यक्तीला म्हणत होते. जणू काय, अहवालाच्या इंग्रजी प्रतींतील त्या व्यक्तीला अक्षरहि कळणार नाही, असा आविर्भाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता! ते आत मराठीची प्रत आणण्याकरता गेले. प्रत घेऊन आल्यावर मायदेव कवि उपरिनिर्दिष्ट व्यक्तीशीं बोलत असतांना दिसले-"कसें काय, आप्पासाहेब देशपांडे, कधी आलांत? विदर्भांतील संशोधन-कार्य कसें चाललें आहे?"-आपल्या समोर असलेली व्यक्ति प्रसिद्ध संशोधक देशपांडे आहेत, हें पाहून प्राध्यापक मजकुरास ओशाळल्यागत झालें! त्यांनी डॉ. देशपांडे यांची माफी मागितली. पण त्यांत त्यांचा तरी काय दोष? आप्पासाहेबांचा पोषाकच इतका साधा असतो की, त्यावरून हे गृहस्थ कोणी माननीय विद्वान् असतील, असा कुणाला संशयहि येणार नाही; इतकेंच काय, पण त्यांच्या मितभाषीपणावरून त्यांना संस्कृत, हिंदी, उर्दू, प्राकृत -इत्यादि अनेक भाषा अवगत असतील, असें कुणाच्या स्वप्नींहि न आलें, तर त्यांत काय नवल?

डॉ. देशपांडे यांचा जन्म १८८३ सालीं पापळ, ता. मूर्तिजापूर, येथून दोन कोस असलेल्या धनज बाजार या गांवीं झाला. त्यांचे वडील सबरजिस्ट्रार होते. धनजच्या मराठी शाळेंत असतांना त्यावेळचे शाळाखात्याचे डायरेक्टर रा. जठार शाळा तपासण्याकरता आले असतां त्यांनी वर्गांतील मुलांना "तूं पुढे कोण होणार?" असा प्रश्न केला. निरनिराळ्या मुलांनी निरनिराळीं उत्तरें दिलीं. देशपांड्यांनी त्यांच्या हातांतील लठ्ठ पुस्तकाकडे पाहून "मी पुढे ग्रंथकार होणार!" असें उत्तर दिलें! तें लक्ष्यांत ठेवूनच की काय, हायस्कूलमध्ये पदार्पण केल्याबरोबर या आमच्या लहानग्या वाङ्मयसेवकाने 'गणेशपद्यावली' नांवाचें चिमुकल्या काव्यसंग्रहाचें पिंपळपान शारदेस वाहिलें.

ए. व्ही. स्कूलमध्ये डॉ. देशपांडे व हल्लीचे मोर्शीचे शामराव गुंड यांनी एक फिरतें वाचनालय काढलें होतें, तेव्हापासूनच त्यांना पुस्तकें वाचण्याचा नाद लागला.

'ज्ञानकोश'कर्ते कै. डॉ. केतकर, प्रसिद्ध कादंबरीकार रा. बाळकृष्ण संतुराम गडकरी व डॉ. देशपांडे या त्रिकुटाची मैत्री हायस्कूलमध्ये जशी गाजली, तशी ती वाङ्मयप्रांतांतहि अढळ होऊन राहिली. वर उल्लेखिलेल्या 'गणेशपद्यावली'चे छापखान्याकडे भाव ठरवून तों मुद्रितें तपासण्यापर्यंतच्या सर्वच बाबतींत डॉ. केतकर यांनी पुढाकार घेतला होता. 'ज्ञानकोशा' सारखा प्रचंड स्वरूपाचा राष्ट्रीय ग्रंथ निर्माण करणाऱ्या डॉ. केतकरांना प्रकाशनकार्यांतील हा पहिला धडाच मिळाला, असें म्हटलें पाहिजे! त्याच काळांत डॉ. देशपांडे यांनी पेरिक्लीज नाटकाचें भाषांतर व 'भारतभूछल' हें एक स्वतंत्र नाटक लिहिलें होतें.

हायस्कूलच्या परीक्षेमध्ये त्यांचा दुसरा नंबर येऊन त्यांना 'बेरार स्कॉलरशिप' मिळाली व १९०१ मध्ये ते मुंबईच्या विल्सन कॉलेजमध्ये

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रविष्ट झाले. त्यावेळच्या त्यांच्या मित्रमंडळांत डॉ. केतकर, डॉ. गुणे, बा. गं. खेर व महामहोपाध्याय पां. वा. काणे ही मंडळी होती. त्यांनी लिहिलेली ' माझी शांती ' ' महाराष्ट्र-वाग्विलास ' या मासिकाची वार्षिक भेट म्हणून देण्यांत आली होती.

बी. ए.त असतांना त्यांना ' होळकरांची थैली ' व दुसरे महत्त्वाचे कागदपत्र उपलब्ध झाले. राजवाड्यांच्या ग्रंथांचें त्यांचें परिशीलन चालूंच होतें व विदर्भांत संशोधन करण्यास फार वाव आहे, हें लक्ष्यांत येऊन संशोधक होण्याची महत्त्वाकांक्षा त्यांच्या मनांत जागृत झाली.

यवतमाळला वकिली सुरूं केल्यानंतर त्यांनी पंधराएक वर्षे सार्वजनिक आयुष्यांत घालविलीं. त्या काळांत त्यांनी येथे थिऑसफीकल सोसायटीची शाखा स्थापन केली व ते आतापर्यंत तिचे अध्यक्ष आहेत. थिऑसफीच्या अभ्यासामुळे त्यांचा दृष्टिकोन विशाल बनून निरनिराळ्या धर्मांतील तत्त्वें त्यांनीं आत्मसात् केलीं व त्या त्या पंथाचें वा समाजाचें ऐतिहासिक संशोधन सारख्याच आस्थेने केलें. त्यांनी जैनांचे प्राचीन अवशेष पाहून त्यांवर जसें संशोधनपर लेखन वा भाषणें केलीं, त्याचप्रमाणें बुध्दाच्या प्राचीन अवशेषांवरहि तितक्याच आपुलकीने लिखाण व भाषणें केलेलीं आहेत; इतकेंच काय, पण इस्लामी धर्म व समाज यांच्या पर्शियन सनदा, शिलालेख, परगण्यांचे कागद वगैरे मिळवून त्यांनी त्यांसंबंधी महत्त्वाचे लेख लिहिले. इस्लामी मशिदीचे पेश इमाम यांच्या विनंतीवरून त्यांनी लंडनच्या ' वोकिंग ' नांवाच्या एका भागांत ' महंमदाच्या शिकवणीपासून आपल्याला काय घेतां येण्यासारखें आहे ?! यावर महत्त्वाचें व सुश्राव्य व्याख्यान दिलें, याचा कुणास अचंबा वाटणार नाही !

याच काळांत ते यवतमाळ तालुका मंडळाचे अध्यक्ष, जिल्हा मंडळाचे उपाध्यक्ष, १९१६ सालीं भरलेल्या यवतमाळ--जिल्हा--राजकीय--परिषदेचे स्वागताध्यक्ष इत्यादि निरनिराळ्या नात्यांनी लोकांसमोर आले. त्यांचा ओढा राजकारणाकडे नसल्यामुळे त्यांनी राजकीय बाबतींत डोकें घातलें नाही, मतें बनविलीं नाहीत व पक्ष स्वीकारला नाही, तरी यवतमाळ जिल्ह्यांतील राजकीय पुढाऱ्यांविषयीं त्यांनी कळकळीची व सक्रीय सहानुभूति वेळोवेळीं प्रकट केलेली आहे.

१९२० ते २५ च्या काळांत त्यांचें लक्ष्य संशोधनाकडे अतिशय आकृष्ट झालें. विशेषतः महानुभाव ग्रंथाचा तर त्यांना ध्यासच लागला ! त्यांचें राहतें घर काषाय व कृष्ण वस्त्रें परिधान केलेल्या महानुभावीय संन्याशांनी फुलून जाऊं लागलें ! या सर्व अभ्यासाचें दृश्य फल म्हणजे त्यांचा १९२६ सालीं प्रकाशित झालेला ' महानुभावीय मराठी वाङ्मय ' हा ग्रंथ होय.

त्यानंतर लवकरच त्यांनी महानुभावीय संशोधनाचें एकमेव केंद्र बनलेल्या शारदाश्रमाची मुहुर्तमढ रोवली. कोणत्याहि नव्या गोष्टीची सुरवात होतांच नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणें त्यावर टीका झालीच ! टोपण नांवाचे बुरखे घेऊन कित्येकांनी शारदाश्रमावर चोरटे हल्ले केले. त्यांपैकीं ' प्रतोद '* या सद्गृहस्थाच्या लेखणीच्या फटकाऱ्यांतून विदर्भ-साहित्य-संघ, विदर्भाचे प्रमुख साहित्यिक-यांपैकीं कोणीच सुटलें नव्हतें व त्याने शारदाश्रमाच्या चालकांनाहि चांगलाच प्रसाद दिला होता ! हा पहिला हल्ला ' महाराष्ट्र ' पत्रांतून झाला ! ता. २३-२-२६ च्या ' महाराष्ट्रांती 'ल बनारसच्या ' ना. गो. दे. ' चा ' संघशक्ति व जाहिरातकला ' व १-३-२६ च्या अंकांतील '*रा. कृ. देशपांडे ' यांचा ' मानभावी संशोधकांचे कंपू ' हे लेख चांगलेच तिखट होते ! मशारनिल्हे ' ना. गो. दे. ' यांचें पुढील अवतरण कसें मासलेवाईक होतें, पाहा : " महानुभावीय संशोधनाइतकें बसल्याजागीं थोडक्यांत लौकिक मिळवून देणारें दुसरें संशोधन नाही ! प्रवास नको, कष्ट नको, सूक्ष्म तौलनिक ज्ञान नको......! "

*' प्रतोद, ' बनारसचे(?) ' ना. गो. दे. ' वगैरे खरीं-खोटीं नांवें घेणाऱ्या व्यक्ति कोण असाव्या, किंवा यांपैकी कांही व्यक्ति खऱ्याच असल्यास त्यांचा ' बोलविता धनी ' कोण असावा, हें ' महाराष्ट्रा 'ची तेव्हाची माहिती असलेल्या लोकांना ठाऊकच आहे ! —संपादक

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संशोधनकार्याकरता किती प्रवास व पायपिटी करावी लागते व राजकारण, धर्म, समाज, भाषा-इत्यादि अनेक गहन शास्त्रांत संशोधकाला आपल्या प्रखर बुद्धिमत्तेचा व श्रमसातत्याचा 'दधिक्रा * ' कसा सोडावा लागतो, याची बिचाऱ्या 'ना. गो. दे.' ला काय कल्पना! डॉ. देशपांडे यांनी शारदाश्रम निर्माण करण्यापूर्वी पंजाब-पेशावर-जमरूड पासून तों दक्षिण हिंदुस्थान-पर्यंत किती प्रवास केला, प्राचीन कागदांचा एकेक तुकडा मिळविण्याकरता काय कष्ट केले व संशोधन-कार्याला जरूरीच्या अशा शास्त्रांचें किती खोल अध्ययन केलें, याची थोडीशी जरी कल्पना 'ना. गो. दे.' यांस असती, तर तो असले बेजबाबदार विधान करावयास धजता ना! पण 'ना. गो. दे.' लाच दोष देण्याचें कारण नाही. जेथे संशोधनाचें महत्त्व आजहि सर्वसाधारण लोकांना यथातथाच वाटते, तेथे तें १९२६ सालांत त्याहिपेक्षां कमी वाटत असल्यास काय आश्चर्य? शारदाश्रम सुरू झाल्यानंतर कित्येक वर्षें जनता त्याविषयीं उदासीनच राहिली व संस्थेस आर्थिक मदतहि फारशी मिळाली नाही! सर्वसाधारण राजकीय पुढाऱ्यांनाहि जनतेकडून मान, पैसा इत्यादिकांचा लाभ होतो, पण तिच्याकडून पहिल्या प्रतीच्या संशोधकांची दखलहि घेतली जात नाही! हें कार्य खरोखरच इतकें क्षुल्लक आहे काय? एके प्रसंगीं लो. टिळक डॉ. केतकरांना म्हणाले, "मला वाटतें की, माझें चिरकाल राहील असें कार्य म्हणजे 'ओरायन,' 'ऑर्क्टिक होम इन् दि वेदाज' व 'गीतारहस्य' हचें आहे!" ×हे उद्गार चिंतनीय नाहीत, असें कोण म्हणेल? पण बहुजन समाजाला सामान्य देशभक्तांचा अल्पकालीन तुरुंगवासहि रोमहर्षणाचा प्रसंग वाटतो, पण त्याला अज्ञान राक्षसाच्या डोळ्यांत धूळ फेकून ज्ञानामृताचा कुंभ आणणाऱ्या संशोधकाचा गरुड पराक्रम मात्र लक्ष्यांत घेण्या-इतकाहि महत्त्वाचा वाटत नाही, हेंच खरें!

महाविदर्भांत अनेक ठिकाणीं विखुरलेली साधन-सामुग्री एकत्रित करण्याचा पहिला सुसंघटित प्रयत्न शारदाश्रमानेंच केला. रा. वा. ना. देशपांडे यांच्यासारखे अव्वल दर्जाचे साहित्यसेवक व रा. रा. द. दामले, वकील, यांच्यासारखे उत्साही कार्यकर्ते शारदाश्रमाला लाभल्यामुळे त्याची उत्तरोत्तर प्रगतीच होत गेली. शारदाश्रमाने आतापर्यंत प्राचीन-अर्वाचीन काव्यापासून तों तहत संशोधन, पुराणवस्तुशास्त्र वगैरे पर्यंतच्या विषयांवरील २०-२२ ग्रंथ प्रकाशित केले आहेत. त्यांपैकी अनेकांना विद्वज्जनसभांकडून पारितोषिकें-वगैरे मिळालेलीं आहेत व त्यांपैकी बहुतेक निर-निराळ्या विद्यापीठांतून अभ्यासिले जात आहेत.

केवळ १० वर्षांच्या अवधींतच शारदाश्रमाच्या कार्याचा किती जयजयकार झाला व 'ना. गो. दे.' चें भाष्य कसें खोटें पडलें, हें शारदाश्रमावरील विद्वानांनी वेळोवेळीं प्रकट केलेलीं मतें व विशेषत: युरोपमधून जागतिक ऐतिहासिक परिषदेकरता प्रतिनिधी पाठविण्याच्या आलेल्या आमंत्रणावरून दिसून येतें. यांपैकी दोन तीनच अभिप्राय उद्धृत करतों. "श्री. य. खु. देशपांडे यांनी स्थापलेल्या शारदाश्रमाने संशोधनाची नवीन परंपरा या प्रांतांत सुरू केली!"........(स्वागताध्यक्षीय भाषण १८ वें महाराष्ट्र-साहित्य संमेलन, नागपूर) "शारदाश्रमाच्या संशोधनकार्याची आंतर्राष्ट्रीय संशोधन-क्षेत्रांत मान्य होण्याचीं चिन्हें दिसत आहेत" —ना. के. बेहरे. "Such an institution is a national asset" –Jadunath Sarkar, G. S. Sardesai, Y. M Kale.

१९२८ पासून डॉ. देशपांडे हिस्टॉरिकल कॉंग्रेसचे सभासद आहेत. हिस्ट्री कॉंग्रेस, ओरिएंटल कॉंग्रेस व रेकॉर्डस् कमिशन-इत्यादिकांच्या अधिवेशनाची त्रिस्थळीं यात्रा त्यांनी बहुतेक चुकूं दिली नाही.

नागपूर विद्यापीठाच्या एम्. ए. चे परीक्षक, पी. एच्. डी. च्या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक, नागपूर विद्यापीठांतील ग्रंथ-निवडणुकीच्या मंडळाचे सभासद, यवतमाळ वर्णाश्रम धर्मशाळेचे अध्यक्ष,

---

* ऋग्वेदांत उल्लेख केलेला अश्व.

× 'विद्यासेवक,' वर्ष ६, अंक ७ वा, एप्रील-मे-जून १९३६.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वऱ्हाड-मध्यप्रांत-जैन-संशोधन-मंडळाचे सल्लागार, १९४४ सालीं झालेल्या महाविदर्भ इतिहास–परिषदेचे अध्यक्ष, आकोट येथील विदर्भ–साहित्य-संघाच्या अधिवेशनाचे अध्यक्ष–इत्यादि मानाच्या जागांवरून झालेलें त्यांचें कार्य उल्लेखनीय नाही, असें कोण म्हणेल ?

१९३९ सालीं स्वित्झरलंडमधील झुरिच येथे भरलेल्या जागतिक ऐतिहासिक परिषदेस शारदाश्रमातर्फे प्रतिनिधी म्हणून हजर राहण्याचा मान त्यांस मिळाला. त्यांनी या परिषदेंत 'Indian Econography' व 'Pre-historic rock paintings in India' हे शोधनिबंध वाचले. निबंधवाचन झाल्यावर कांही स्विस व फ्रेंच विदुषी यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केलें व त्यांनी डॉ. ओटमार विडमेर या विद्वानांशीं त्यांचा परिचय करून दिला. त्यांनी डॉ. देशपांडे यांस स्विस युनिव्हर्सिटीमधील प्राचीन मूर्तिसंग्रह दाखविला व धातुमूर्तींच्या प्रभावळीवरील त्यांना न लागलेले कित्येक लेख विचारून घेतले. तेथील विष्णूच्या मूर्तीवरील 'संवत् १८५१ वर्षे प्रागवाट् ज्ञातीय बाहीरीडी पुए, प्टी या देवनागरी अक्षरवटिकेंत असलेल्या महत्त्वाच्या वाक्याचा अर्थ समजावून सांगतांच देशपांडे यांच्या भाषाविषयक ज्ञानाची त्यांना चांगली कल्पना आली ! झुरिच परिषदेनंतर ऱ्हाईनचा धबधबा व फ्लायबर्ग कॅसल इत्यादि इतिहासप्रसिद्ध स्थळें त्यांनी अवलोकिलीं. फ्रान्समधील मराठी भाषेचे जगन्मान्य तज्ज्ञ ज्यूल ब्लॉक यांची भेट बेल्जमच्या प्राच्यविद्यापरिषदेच्या वेळेस झाली व त्यांच्याशीं संशोधनविषयक महत्त्वाची चर्चा झाली. बेल्जिक म्युझिअममधील नेपोलियनचें मृत्युशय्येवरील दृश्य जितकें हृदयस्पर्शी आहे, तितकाच वाटर्लूच्या रणमैदानावरील देखावाहि नवलपूर्ण आहे, असें ते सांगतात. पॅरिसमधील पॅन्थेनियममधील राष्ट्रपुरुषांचे पुतळे, कीर्ति मंदिरें, समाधिमंदिरें, स्मृतिस्तंभ–इत्यादि अत्यंत प्रेक्षणीय आहेत, असें ते सांगत असतात.

पॅरिस, लंडन इत्यादि ठिकाणीं त्यांनी आपल्या पुढील ग्रंथाकरता २–३ महिने टिपणें घेतलीं. पाश्चिमात्य व पौर्वात्य पंडितांनी, विशेषतः फ्रेंच पंडितांनी, भारतीय भाषांसंबंधीं (Indo-Aryan languages) जें संशोधन केलें आहे व मराठी भाषेच्या उत्पत्तीविकाससंबंधाने पौर्वात्य व पाश्चिमात्य पंडितांनी जें लिहिलें आहे, त्यांपैकी जरूर त्या लिखाणाचा उपयोग करून मराठी भाषेची उत्पत्ती व विकास व इतर भाषांचा मराठीवर झालेला परिणाम यावर तौलनिक पध्दतीने इंग्रजींत ग्रंथ लिहावा, हा त्यांचा संकल्प होता व आहे. त्या ग्रंथाचा भक्कम पाया वरील अभ्यासाने घातला गेला, यांत शंका नाही.

विंध्यशक्ति-ताम्रपट, उनकेश्वराचे व मार्कंडचे शिलालेख, कायरचे सातवाहन-कालीन लेख-इत्यादि आणि इतरहि यावरील अनेक ताम्रपट-शिलालेख त्यांचे शोधनिबंध त्यांच्या स्वतंत्र संशोधन-कार्याची उदाहरणें म्हणून सांगतां येतील.

डॉ. देशपांडे हे आजन्म विद्यार्थी आहेत. वाङ्मयाचें अखंडसंशोधन हें त्यांच्या जीविताचें एकमेव ध्येय होऊन बसलेलें आहे. ते सनातनी मताचे असले, तरी कर्मठ नाहीत; व किंचित् धर्मभोळे असले, तरी अंधश्रध्द नाहीत. युरोपहून आल्यानंतर कोटेश्वर येथे जो रुद्रस्वाहाकार यज्ञ झाला, त्यांचे यज्ञकर्ते म्हणून जें पुण्य त्यांनी संपादन केलें, तें सर्व अवभृत स्नानाच्या वेळीं त्यांनी जनतेला अर्पण केलें ! पाप देखील देण्याची जेथे मनुष्याची प्रवृत्ती नसते, तेथे पुण्यावर उदक कोण सोडणार ? या दृष्टीने पाहिलें म्हणजे हा त्याग मोठा नाही काय ? प्राचीन गोष्ट पाहिली की, डॉ. देशपांड्यांचें हृदय उचंबळून येतें ! हीच त्यांच्या संशोधनकार्यांतील यशाची गुरुकिल्ली आहे. त्यांना यवतमाळचा सध्याचा डि. सी. कोण आहे, हें कदाचित् माहीत नसेल. पण प्राचीन काळांतील अमक्या परगण्याचा सुभेदार कोण होता, याची माहिती नक्की असावयाचीच–असे उद्गार एकादे वेळीं गंमतीने कोणी काढल्यास त्यांत त्यांच्याविषयींच्या गुप्त आदराची भावनाच दिसते ! त्यांचें सिगारेटचें अग्निसत्र प्रत्येक सालच्या ३१ डिसेंबरला १२ च्या ठोक्याला सुरूं होऊन ३१ जानेवारीच्या १२ च्या ठोक्याला नक्की बंद पडतें ! एवढें सोड-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यास त्यांना कसलेंहि व्यसन नाही ! त्यांच्या सहवासांत असणाऱ्याला त्यांची निगर्वी वृत्ति, औपचारिकपणाचा कंटाळा, प्रांजलपणा, साधी, खलस वागणूक, मनाचा उमदेपणा, आपलेपणाची भावना, कोणाला कधीहि न दुखविण्याची प्रवृत्ति, प्रसंगीं गंभीर विनोद, कसल्याहि प्रसंगीं न भांबावणारी स्थितप्रज्ञ वृत्ति, भावनांचा अत्यंत संयम इत्यादि त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू पाहावयास मिळतात. श्री. देशपांडे यांनी अश्रांत परिश्रम करून महानुभावांच्या विशाल वाङ्मयाचें सत्य-स्वरूप जनतेसमोर मांडून त्या पंथाविषयीं तिच्या मनांत आदर उत्पन्न करण्याचें व त्याचबरोबर मराठी भाषेची सेवा करून संशोधनाचें नवें क्षितीज हल्लीच्या व पुढील पिढ्यांकरता महाविदर्भांत निर्माण करण्याचें कार्य केलें, हीच त्यांची श्रेष्ठ कामगिरी होय. शारदाश्रम संस्थेनें १९४४ सालीं त्यांचा षष्ठ्यब्दि–पूर्ति–समारंभ साजरा करून त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव केला व नागपूर विद्यापीठाने त्यांना 'डॉक्टर ऑफ लेटर्स'ची सन्मान्य पदवी देऊन त्यांच्या कार्याचें चीज केलें, याबद्दल दोहोंसहि सारखेच हार्दिक धन्यवाद द्यावयास पाहिजेत.

• • •

महादेवी वर्मा

सौ. लीला दुबे, एम्. ए.

● सुप्रसिद्ध हिंदी कवयित्री महादेवी वर्मा यांचा – व विशेषतः त्यांचें गद्य-पद्यात्मक वाङ्मय यांचा अत्यंत सरस व मार्मिक परिचय नागपुरच्या सौ. लीला दुबे यांनी या लेखांत करून दिला आहे.

महादेवी या जशा श्रेष्ठ कवयित्री आहेत; तशाच उत्कृष्ट गद्य-लेखिकाहि आहेत, हें कळून आमचे मराठी कवि चाटच होतील ! कवीने गद्य लिहूं नये, किंबहुना जो गद्य लिहितो तो मुळीं कवि असूंच शकत नाही, अशी विकृत कल्पना किती तरी मराठी कवींची असल्याचे सर्वश्रुतच आहे !

★ ★ ★

महादेवी वर्मा हिंदी साहित्यांतील एक अप्रतिम विभूति आहेत. त्यांची बहुमुखी प्रतिभा काव्य, ललित-गद्य व विवेचनात्मक गद्य या सर्व प्रांतांत विकसित झाली आहे.

साहित्यिक म्हणून तर महादेवी मोठ्या आहेतच परंतु व्यक्ति म्हणून देखील त्यांचं जीवन वाखाणण्याजोगंच आहे. सध्या महादेवी प्रयाग येथील महिला विद्यापीठाच्या मुख्याध्यापिका आहेत. शुभ्र खादीच्या पोषाखांत त्यांची साधी रहाणीची आवड स्पष्ट दिसून येते. स्वयंपाक व शिवणकाम यांसारख्या रोजच्या व्यवहारांतील गोष्टींपासून तों मूर्तिकला व चित्रकला यांजपर्यंत सर्वच करण्यांत त्या कुशल आहेत. महादेवींच्या कलात्मक हृदयाचा आविष्कार त्यांच्या घराच्या सजावटींत देखील दृष्टीस पडतो. त्यांचं मन अत्यंत भावनाप्रधान व अनुभूतिशील आहे. दुःखी आत्म्यांबद्दल त्यांना स्वभावतःच आपलेपणा वाटतो आणि हा आपलेपणा व प्रेम कोरडं नसतं. 'दीपशिखे'च्या प्रस्तावनेंत त्यांनी स्पष्ट लिहिलं आहे की, जोंपर्यंत साहित्याव्यतिरिक्त इतर काम करून त्या आपली उपजीविका करूं शकतात तोंपर्यंत साहित्यसेवेपासून त्यांना मिळालेल्या संपत्तीवर जे कमावण्यास असमर्थ आहेत किंवा काम करून देखील ज्यांना पुरेसं वेतन मिळत नाही, अशा अभागी-लोकांचाच फक्त अधिकार राहील. महादेवींची वागणूक प्रेमळ व निष्कपटी असते. ज्यांना त्यांच्या सहवासाचा लाभ झाला आहे त्यांच्या मतें बोलतांना महादेवी अधिक हंसतात की बोलतात

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हाच पहाणाऱ्याला प्रश्न पडतो. त्यांच्याशी प्रत्यक्ष परिचय नसला, तरी त्यांची शब्दचित्रं वाचून महादेवींच्या स्वभावांतील बऱ्याच प्रशंसनीय गुणांचं अनुमान करतां येतं.

हिंदींतील 'छायावाद-रहस्यवाद' युगाच्या कवि-कवयित्रींमध्ये पन्त, 'प्रसाद', 'निराला' व महादेवी वर्मा यांचं स्थान सर्वांत महत्त्वपूर्ण आहे. पन्त आपली कोमल पदावली व पदलालित्य यांकरिता, 'प्रसाद' आपल्या काव्यांतील गिरी-गंभीर दार्शनिक भव्यतेकरिता, तर 'निराला' नवे नवे काव्यप्रयोग व भाषेतील ओज यांकरिता प्रसिद्ध आहेत. या उलट महादेवी वर्मा आपल्या सखोल दुःखवादाच्या तीव्र अनुभूतीच्या जोरावर वाचकांचं हृदय आकर्षून घेतात. जरी त्यांच्या काव्यांत जिकडे तिकडे 'अनन्त,' 'निस्सीम'-वगैरेंचे संकेत विखुरलेले आहेत, तरी कवयित्रीची अभिव्यक्ति मूलतः मानवी व लौकिक वाटते. एका अनुभूतिशील भावुक हृदयाचे निःश्वास म्हणून आपण महादेवींचं काव्य सहजच ग्रहण करूं शकतों. त्यांची छायावादी शब्दावली आपल्याला एका अज्ञात व दुर्बोध अशा जगांत नेऊन सोडत नाही. उलट, त्यांच्या कवितांतून प्रकट झालेल्या मीलन-विरह-वगैरेंच्या उत्कट भावनांमुळे त्यांचा 'आत्मा-नुभूत अनन्त' देखील मानवी वाटूं लागतो. याच-मुळे की काय, बऱ्याचशा छायावादी कवींच्या कांही प्रसिद्ध रचनांचं महत्त्व हळूहळू कमी होत असतांनाहि महादेवींचं काव्य चिर नवीन व अधि-काधिक आकर्षकच प्रतीत होत आहे.

'यामा' मध्ये महादेवींनी आपले 'नीहार,' 'रश्मि,' 'नीरजा' व 'सान्ध्यगीत' हे चार पूर्वप्रकाशित कवितासंग्रह एकत्रित केले आहेत व त्यांत त्यांनी आपलीं कांही चित्रंहि दिलीं आहेत. त्यांचा नवीन कवितासंग्रह 'दीपशिखा' तर सौंदर्याच्या दृष्टीने अतुलनीय आहे. इतक्या कलात्मक रीत्या छापलेलं पुस्तक हिंदींत दुसरं नाही. 'दीपशिखे'त एकंदर ५१ कविता आहेत व प्रत्येक कवितेची पार्श्वभूमि म्हणून त्यांनी स्वतः काढलेलं एक एक चित्र दिलेलं आहे. चित्रं अतिशय सुंदर असून त्यांच्यावर मूर्तिकलेची छाप स्पष्ट दिसते. कवितेंतील भाव चित्रांत उम-टविण्याचा यशस्वी प्रयत्न महादेवींनी केला आहे. हा संपूर्ण संग्रह महादेवींच्या स्वतःच्या हस्ताक्षरांत छापलेला आहे. या सर्वांमुळे 'दीपशिखा' पुस्तक वाचनीयच नव्हे, तर दर्शनीय देखील झालं आहे.

महादेवींची वर्णन करण्याची हातोटी विलक्षण आहे व त्यांच्या कवितांत कल्पनावैचित्र्यहि भरपूर आहे. म्हणूनच दुःखवादी व रहस्यवादी असलं, तरी त्यांच्या काव्यांत वाचकाच्या मनांत मानवी भावनाच जागृत करण्याचं सामर्थ्य आहे.

खालील ओळींतील कल्पना किती सुंदर व हृदयाचा ठाव घेणारी आहे–

आलि, कहाँ सन्देश भेजूं?
मैं किसे सन्देश भेजूं?
नयनपथ से स्वप्न में मिल,
प्यास में घुल, साध में खिल,
प्रिय मुझी में खो गया, अब दूतको किस देश भेजूं?

किंवा,

जो तुम आ जाते एक बार।
कितनी करुणा कितने सन्देश
पथमें बिछ जाते बन पराग।
गाता प्राणों का तार तार
अनुराग भरा उन्माद राग
आँसू लेते वे पद पखार।

निसर्गाच्या निरनिराळ्या स्वरूपांची आपल्या मननशील हृदयावरील प्रतिक्रिया महादेवींनी आपल्या सहजसुंदर भाषेंत वर्णिली आहे.

मेघांचं त्यांनी केलेलं वर्णन पहा—

कहाँसे आये बादल काले
कजरारे मतवाले!
शूलभरा जग, धूल भरा नभ
झुलसी देख दिशायें निष्प्रभ
सागर में क्या सो न सके यह
करुणाके रखवाले!
आँसू-का तन विद्युत् का मन
प्राणों में वरदानों का प्रण
धीर पदों से छोड चले घर
दुखपाथेय सँभाले!

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रजनीचं स्वागत महादेवींनी खालील शब्दांत केलं आहे—

धीरे धीरे उतर क्षितिजसे
आ वसन्त रजनी।
तारकमय नव वेणीबंधन
शीश फूल कर शशि का नूतन
रश्मिवलयसित घन-अवगुंठण
मुक्ताहल अभिराम बिछा दे
चितवन से अपनी
पुलकती आ वसन्त रजनी।

'अनन्ता' ला उद्देशून लिहिलेल्या खालील ओळी किती मर्मस्पर्शी आहेत —

जब यह दीप बुझे तब आना!
लौ ने वर्तीको जाना है,
वर्ती ने यह स्नेह, स्नेह ने
रज का अंचल पहचना है,
चिर बन्धन में बांध इन्हें घुलने का वर दे जाना!

महादेवी वर्मा कवयित्री म्हणून जास्त प्रसिद्ध असल्या, तरी त्यांचं गद्यसाहित्य काव्याच्या मानाने थोडं असूनहि कमी महत्त्वपूर्ण नाही. उलट कांही अंशीं त्यांचं समाजाभिमुख गद्यच आत्माभिमुख काव्यापेक्षा सरस आहे. कारण त्यांच्या काव्याला मिळालेली नवीन दिशा रवींद्रनाथ ठाकूर, 'बापू' व बंगालांतील दुष्काळ यांच्यावर लिहिलेल्या कवितांतून अस्पष्टपणें प्रकट झालेली असली, तरी मूलतः महादेवींचं काव्य व्यक्तिनिष्ठ व आत्मकेंद्रित आहे. बाहेरील जगांतील सुखदुःखांशीं त्याचा कांहीच संबंध नाही. त्यांचं काव्यांतील व्यक्तित्व आपल्याच दुःखांत रमणारं व त्यांतच एक प्रकारचा आनंद मानणारं, असं आहे.

मैं नीरभरी दुख की बदली,
विस्तृत नभ का कोई कोना,
मेरा न कभी अपना होना
परिचय इतना इतिहास यही
उमडी कल थी मिट आज चली।

या चार-पाच ओळींतच महादेवींच्या कवितेंतील व्यक्तित्वाचा पूर्ण परिचय होतो. याच्या उलट, त्यांचं गद्य समाजकेंद्रित आहे. जनतेच्या दुःखाला त्याने वाचा फोडली आहे. त्यांत समाजांतील दुःखं व दैन्य याबद्दल तीव्र सहानुभूति आहे, स्वार्थ व पिळवणूक यांविरुद्ध प्रतिकाराची भावना आहे आणि अंधश्रद्धा व संकुचितपणा यांबद्दल असंतोषहि आहे.

महादेवींनी स्वतः म्हटलं आहे कीं, विशाल साहित्यिक परिवाराचे हर्ष व विषाद माझे आहेत, परंतु त्याच्याबाहेर उभ्या असलेल्या व्यक्तींच्या सुखदुःखांच्या कथा देखील मला परक्या वाटत नाहीत. ज्या व्यक्तींशी त्यांचा संबंध आला व ज्यांना महादेवींच्या हृदयांत स्थान मिळालं, त्या साध्याभोळ्या जीवांच्या सुखदुःखांच्या कथाच त्यांनी आपल्या 'अतीत के चलचित्र' व 'स्मृति की रेखाएँ' या दोन गद्यसंग्रहांत वर्णिलेल्या आहेत. या सर्वच माणसांच्या आयुष्यांत सुखापेक्षा दुःखाचं पारडं भारी आहे. महादेवींच्या लघुजीवनांत ज्या ज्या छोट्या व्यक्ति आल्या, मग तो चीनी कापडवाला असो, आवार झाडणारी भंगीण असो किंवा कुंभारीण राधा असो, त्या त्या सर्वांना त्यांनी आपल्या संवेदनाशील अंतःकरणांत आश्रय दिला व स्वतःच्या समर्थ लेखणीद्वारा त्या साधारण पात्रांना देखील साहित्यांत असाधारणपणें प्रतिष्ठित केलं. समाजाकडून उपेक्षिलेल्या व तिरस्कारलेल्या या व्यक्ति महादेवींच्या लेखणीचा सहारा मिळाल्या-मुळे, जणू कांही, आधुनिक समाजापुढे आपल्या अस्तित्वाची घोषणाच करीत आहेत.

महादेवींची स्मरणशक्ति व संवेदनाशीलता अत्यंत तीव्र असली पाहिजे. नाही तर लहानपणीं तैनातींत असलेला 'रामा,' हिंदु विधवेचं लाजिरवाणं जिणं जगत असलेली मारवाडी 'भाभी' व सावत्र आईच्या छळाला कंटाळून मृत्युमुखीं पडलेली चिमुकली 'बिन्दा' या शैशवकालांतील सोबत्यांचीं चित्रं इतकीं मर्मस्पर्शी कशीं वठलीं असतीं?

'जे का रंजले गांजले। त्यांसी म्हणे जे आपुले'– या महादेवींच्या मनोवृत्तीमुळे ज्या ज्या दुःखी व साध्याभोळ्या व्यक्तींशीं त्यांचा परिचय झाला, त्या त्या व्यक्तींनी त्यांचं लक्ष्य वेधून घेतलं. प्रत्येकाचं दुःख कमी करण्याचा त्यांनी यथाशक्ति

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रयत्न केला. कित्येकांनी आपला एकमात्र आधार म्हणून महादेवींकडे धाव घेतली, तर कांहींनी आपलं विसाव्याचं स्थान म्हणून त्यांना जवळ केलं. अठरा वर्षाच्या अनाथ विधवेने पोटच्या गोळ्याला दुष्ट समाजापासून वाचविण्यासाठी त्यांच्याजवळ आश्रय मागितला, तर चिनी कापडविक्याने 'सिस्तर' म्हणून त्यांना आपली व सावत्र आईच्या जबरदस्तीमुळे वेश्या बनलेल्या आपल्या अभागी बहिणीची दुःखमय जीवनकथा सांगितली. या सर्व उपेक्षित व्यक्तिबद्दल महादेवींना वाटलेलं प्रेम, सहानुभूति व आत्मीयता यांमुळेच हीं शब्दचित्रं इतकीं परिणामकारक वठलीं आहेत. त्यांची अनुभूति व्यापक आहे व म्हणूनच त्यांच्या व्यक्तिचित्रांत वैचित्र्यहि भरपूर आहे. या शब्द-चित्रांत महादेवींची भाषा अत्यंत सुंदर व ओघवती आहे. भाषेच्या ओघाबरोबर वाहत जाणाऱ्या वाचकाला, लिहिलेलं हृदयापर्यंत जाऊन भिडणारं व खोल विचार करावयाला लावणारं असल्यामुळेच केवळ मधूनमधून थांबावं लागतं. हीं सर्व पात्रं सत्यसृष्टींतील असल्यामुळे लिखाणांत निव्वळ कल्पनेची भरारी नाही, परंतु त्याची निर्मम वास्तविकता इतकी तीव्र आहे की, मानव-जीवनांतील सूक्ष्म-सूक्ष्म घटनांचं एवढं मार्मिक व हृदयस्पर्शी वर्णन करण्याच्या त्यांच्या असाधारण सामर्थ्याबद्दल महादेवींची प्रशंसा केल्याशिवाय राहवत नाही. कवितेंत काय, किंवा गद्यांत काय, डोळ्यांपुढे चित्र उभं करण्याचं महादेवींचं कौशल्य और आहे; आणि, हीं तर त्यांना प्रत्यक्षांत भेटलेल्या व्यक्तींचीं चित्रं! मग त्यांचं वर्णन बहारीचं होणार नाही, तर काय? आंधळा असूनहि सर्व जगावर विश्वास ठेवणारा पण बायकोने फसवतांच मात्र जीवनांतील आनंदाचा व विश्वासाचा कण न् कण गमावून बसणारा 'अलोपी' काय, किंवा लहानपणापासून नटण्यामुरडण्याची आवड असलेली पण आयुष्याचे धिंडवडे निघाल्यामुळे जीव देणारी मानिनी धोबीण काय—सर्वांनाच महादेवींनी आपल्या लेखणीच्या सामर्थ्यानं हिंदी साहित्यांत अमर केलं आहे. बाईंना शेवटची भेट देण्यासाठी म्हणून अंगांतील एकुलता एक कोरा सदरा विकून त्याच्या बदल्यांत टरबूज विकत घेणाऱ्या लहानग्या 'घीसा'चं निर्मळ व भोळं प्रेम हृदयाला हलवून सोडणारं नाही, असं कोण म्हणेल? समाजाने दुर्लक्ष्य केलेल्या व दुःखाचा प्याला वाट्याला आलेल्या या सर्व व्यक्तींबद्दल सारख्याच आत्मीयतेने व सहानु-भूतीने लिहिलेलीं हीं शब्दचित्रं हिंदी साहित्यांतच नव्हत, तर हिंदुस्थानांतील साहित्यांत अपूर्व आहेत.

'अतीत के चलचित्र' व 'स्मृति की रेखाएँ' यांमध्ये समाजाच्या निर्ममतेबद्दल टीका असली, तरी ती ओघाने आली आहे. हे संग्रह मुळांत टीकात्मक किंवा विवेचनात्मक नाहीत. महादेवींनी आपल्या काव्यसंग्रहांकरिता ज्या गंभीर भूमिका लिहिल्या आहेत, त्यांचा विवेचनात्मक गद्यांत समावेश होतो. 'चाँद'च्या संपादिका या नात्याने त्यांनी स्त्रियांच्या प्रश्नावर जे संपादकीय लेख लिहिले तेच एकत्र करून 'शृंखला की कडियाँ' या नांवा-खाली छापले आहेत. भारतीय नारीच्या परवशतेची कारणं महादेवींनी सखोल विचार करून शोधून काढलीं आहेत. व त्याकरिता उपायहि सुचविले आहेत. 'शृंखला की कडियाँ' मध्ये अशास्त्रीय भावनाप्रधानताहि नाही व त्याचबरोबर भावनाशून्य व रूक्ष विवेचनहि नाही. नारी-समस्येच्या निरनिराळ्या पैलूंचा शास्त्रीय दृष्टीने विचार करून ओजस्वी व परिणामकारक भाषेंत महादेवींनी आपले मौलिक व महत्त्वपूर्ण निष्कर्ष मांडले आहेत.

स्त्रीचं कार्यक्षेत्र चूल व मूल यांतच सीमित राहिलं पाहिजे, या मतांशीं महादेवी सहमत नाहीत. परंतु त्याचबरोबर आधुनिक स्त्रीचा गृहकर्माबद्दलचा तिटकाराहि त्यांच्या मतें तिची स्त्रीसुलभ कोमलता नष्ट करणारा आहे. गृहिणीधर्म व बाहेरील कार्यक्षेत्र यांत विरोध आहे, असं महादेवींना मुळींच वाटत नाही. मातृत्वाची जबाबदारी योग्य रीतीने पार पाडून सामाजिक कार्य करण्याकरिता महादेवींनी स्त्रियांकरिता बालसाहित्य व महिलासाहित्य यांची निर्मिति करण्यासारखीं कामं सुचविलीं आहेत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वेश्यांबद्दल महादेवींचा दृष्टिकोन केवळ सहानुभूतिपूर्णच नाही, तर वस्तुस्थितीवर आधारलेला असल्यामुळे प्रगतिशील देखील आहे. त्या लिहितात—

'ज्यांना गर्वित समाज पतित म्हणत आला आहे, त्या या स्त्रियांना पुरुषांच्या वासना-वेदीवर केवढं घोर बलिदान करावं लागलं आहे, याचा विचार कोणीच करीत नाही. पुरुषांचा रानटीपणा व रक्तलोलुपता यांकरिता बळी दिल्या जाणाऱ्या वीरांची पाहिजे तर स्मारकं बनविल्या जातील, पुरुषांच्या अधिकाराच्या भावनेला अबाधित ठेवण्याकरिता धगधगणाऱ्या चितेमध्ये क्षणांत जळून खाक होणाऱ्या स्त्रियांची नांवें पाहिजे तर इतिहासांत सुरक्षित राहतील, परंतु पुरुषांच्या कधीहि न विझणाऱ्या वासनाग्नीमध्ये हसत हसत आपलं जीवन तिळतिळ झिजवणाऱ्या या रमणींना मनुष्यजातीनें कधी दोन अश्रू मिळण्याचा देखील अधिकार ठेवलेला नाही!'

वस्तुस्थितीचा विचार करून व स्त्रियांच्या दुर्दशेबद्दल सहानुभूतिपूर्ण व मार्मिक विवेचन करून महादेवींनी वैधव्य, स्त्रियांचें आर्थिक स्वातंत्र्य, सामाजिक रूढि-यांबद्दलचे आपले क्रान्तिकारी विचारहि अत्यंत सरस व सुस्पष्ट भाषेत मांडले आहेत.

सुंदर भाषाशैली, दुःखी लोकांबद्दल आत्मीयता, नवीन विचार ग्रहण करण्याचं सामर्थ्य व प्रांजळपणा या गुणांमुळे महादेवींचं गद्यसाहित्य अतिशय प्रभावशाली झालेलं आहे. त्यांचं संवेदनाशील व अन्यायाचा प्रतिकार करण्याकरिता सदैव तत्पर असलेलं मनच त्यांच्या गद्यसाहित्यांत प्रतिबिंबित झालं आहे.

महादेवींचं साहित्य इतकं विविध प्रकारचं व इतकं मार्मिक आहे की, एका लहानशा लेखांत त्याची पुरेशी ओळख करून देतां येणं कठीण आहे. त्याकरिता 'यामा' व 'दीपाशिखा' यांमधील मधुर काव्य 'अतीत के चलचित्र' व 'स्मृति की रेखाएँ' यांमधील हृदयस्पर्शी संस्मरण आणि 'शृंखला की कडियाँ' – मधील स्त्री–समस्येवरील सहानुभूतिपूर्ण शास्त्रीय विवेचन वाचणं आवश्यक आहे.

● ● ●

केशवसुतांची 'स्वर्गसृष्टि'

लेखांक १ ला

—श्रीराम अत्तरदे, एम्. ए.

● जळगांवचे रा. अत्तरदे हे साहित्यिक व समाजवादी कार्यकर्ते म्हणून खानदेशांत प्रसिद्ध आहेत. आधुनिक मराठींतील सर्वश्रेष्ठ कवि केशवसुत यांच्या कवितेची मार्क्सवादी दृष्टिकोनांतून विचिकित्सा करणारी लेखमाला त्यांनी लिहिलेली आहे, ती 'युगवाणी'तून क्रमशः प्रसिद्ध होणार आहे. तिचा पहिला हप्ता या अंकांत येत आहे.

★ ★ ★

कवि व कवित्व, स्फूर्ति व प्रतिभा इत्यादि गोष्टींबद्दलची कवींची आत्मप्रौढी आजकाल फारशी ऐकूं येत नाही. बदललेल्या काळाचें हें लक्षण आहे. तथापि याचा अर्थ असा नव्हे की, आपल्या 'सामर्थ्या'बाबत कवि साशंक आहेत वा टीकाकार व वाचक कवींबद्दल अनादर बाळगूं लागले आहेत. मध्यन्तरीं रंगभूमीवर विदूषकाची भूमिका कवीच्या पात्राकडे आलेली होती. तो काळहि आता राहिलेला नाही. एतावता, कवींची आत्मप्रौढी व कवींबाबत इतरांची कुचेष्टाबुद्धि या दोहोंचेंहि अवतारकार्य समाप्त झालें आहे म्हणावयाला प्रत्यवाय नाही आणि, ही वस्तुस्थिति

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लक्ष्यांत घेतां आता आधुनिक महाराष्ट्रांतील गाजलेल्या व उपहासिलेल्या अशा दोन्ही प्रकारच्या कवींच्या काव्याची मौलिकता मीमांसणें बरेंच फायदेशीर होणार आहे. प्रस्तुत लेखाचा विषय केशवसुतांपुरता मर्यादित आहे.

समकालीन व पश्चात्कालीन कविसंभावनेंतील फरक आपणाला लक्ष्यांत घ्यायचें कारण नाही, तथापि समकालीन बदलती परिस्थिति,-थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास युगमान व कवीची तत्त्वप्रणालि यांचा परस्परसंबंध शोधणें इष्ट आहे; त्यायोगें केशवसुतांचें समकालांतील प्रगतिप्रवाहांतील स्थान तर कळेलच, आणखी त्यांच्या स्वविषयक उद्गारांचेंहि मूल्यमापन करणें शक्य होईल.

एकाच वर्षी केशवसुत व रेंदाळकर यांचें प्राधान्यानें अध्ययन करावयाचें 'दुर्भाग्य' (!) लाभलेल्या कांही महाविद्यालयीन साहित्यिकपुंगवांनी एकदा मला म्हटलें, 'मराठी विषय घेऊन प्रस्तावलों, बुवा! इथून तिथून सारे कवि रडवे आहेत आम्हांला अभ्यासासाठी!' त्यावर मी उत्तरलों, 'केशवसुत व विशेषतया रेंदाळकर हे रडणारे कवि आहेत खरे, पण ते 'रडवे' आहेत, असें म्हणावयाला मी तयार नाही.' या उद्गारानंतर त्यांच्या उचितपणाचा मीं फारसा विचार केला नाही; परंतु आज रसायनशाळेंतल्या नालिकेंत एखाद्या द्रव्याची तपासणी होते व त्याचे गुणधर्म ज्ञात होतात, त्याप्रमाणें, प्रगतिशील समाजस्थित्यंतराच्या पुढील विशिष्ट विचारसरणीच्या नलिकेंत केशवसुतांच्या काव्याचें पृथक्करण व परीक्षण करून पाहतां केवळ परीक्षणबुद्धीनेच बरींच रहस्यें ज्ञात झाल्याचें आढळूं लागलें.

आधुनिक मराठी काव्यावर इंग्रजी काव्याचा परिणाम अनेक प्रकारांनी झाला. वेदान्त, लावणी, पोवाडे, आख्यानक व संस्कृत भाषान्तरें हे प्रकार तत्पूर्वी मराठींत प्रचलित होते. हे प्रकार काव्याचे विषय व संविधानक या दृष्टींनी अनेक भासले, तरी त्यांचा आत्मा एकच होता. वाङ्मय ही एक शक्ति आहे व उदयोन्मुख दलित वर्ग, त्याचप्रमाणें, प्रस्थापित शासक वर्ग हे आपपाल्या हितसंबंधांसाठी वाङ्मयगुणांना राबवून घेत असतात, ही अनादि कालापासूनची वस्तुस्थिति नाकारण्यांत हशील नाही. केशवसुत-महाजनी यांच्या पूर्वीचें मराठी काव्य हें आरंभापासून त्यावेळेपर्यंत सरंजामदारी समाजव्यवस्थेचें व अर्थव्यवस्थेचें प्रतीक असल्याचें विविध प्रकारांनी दिसून येईल, त्यांपैकी कांही याप्रमाणें—(१) प्रस्थापित राजकीय समाजशासक वर्गाबाबतचा दृष्टिकोन, (२) या वर्गाचा पाठीराखा असलेला व समाजावर नैतिक, वांशिक, आर्थिक, इत्यादि प्रकारांनी वरिष्ठपणाचा व श्रेष्ठतेचा हक्क सांगणाऱ्या उपाध्याय (ब्राह्मण) वर्गाबाबतचा दृष्टिकोन, (३) काव्यगत स्त्रीपात्रांचीं वर्णनें व नीत्युपदेश यांतून प्रतिबिंबित होणारा स्त्रीवर्गाविषयीचा दृष्टिकोन, (४) सर्वसाधारण रीत्या मानवी जीवन वा ऐहिक प्रपंचाबाबत अनुस्यूत होणारी विचारसरणी, (५) सामाजिक अर्थव्यवहारविषयक प्रकट वा प्रच्छन्न विचार, (६) कवींचा पुरस्कर्ता वा आश्रयदाता वर्ग एवंच कवींकडून प्रशस्ति मिळवणारा समाजघटक, (७) निरनिराळ्या समाजघटकांच्या प्रस्थापित न्यूनाधिक महत्त्वाबाबत भूमिका इत्यादि.

या विविध प्रकारांनी केशवसुत-महाजनींपूर्वीचें आरंभापासूनचें मराठी काव्य अभ्यासिलें असतां त्याबाबत कोणते निष्कर्ष निघतात, हें पाहणें उपयुक्त ठरेल व त्यावरूनच ऐतिहासिक परंपरेच्या सरंजामदारी वा इतर कोणत्या युगाचें तें प्रतिबिंबिक आहे, तें ठरवतां येईल.

सरंजामदारी युगाचे विशेष पुढीलप्रमाणे थोडक्यांत सांगतां येतील—

(१) 'गुलामगिरी'वर आधारलेल्या समाजव्यवस्थेनंतरची ही (त्या दृष्टीने पाहतां प्रगत) अवस्था असल्यामुळे तींत अनियंत्रित राजकीय वर्चस्व गाजवणारा एखादा 'क्षत्रिय' वा तत्सम, स्वतःला इतरांहून श्रेष्ठ समजणारा, समाजघटक अस्तित्वांत असतो. प्रजा व राज्यांतील समृद्धि ही या वर्गाची व त्याचे प्रतिनिधि जे राजे, सरदार, जहागीरदार, यांची मालकीची समजली जाते. अर्थात् ओघानेच वाङ्मयामध्ये याच वर्गाच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पराक्रमांचे, अनिर्बंध विलासांचे व श्रेष्ठतेचे गोडवे गाईले जातात. श्रीधरादि कवींनी राजे लोकांचीं वर्णनें करतांना संभोगाचीं व ' सुरतयुद्धा 'चीं जीं प्रकट वर्णनें केलीं आहेत, तीं या वर्गाच्या अभिरुचीचींच द्योतक होत. काव्य हें गद्याहून श्रेष्ठ मानावयाची मध्यकालीन मराठी वाङ्मयांत प्रथा असल्यामुळे मराठी पद्यवाङ्मयांत याच वर्गाचें वा त्याच्या हितसंबंधांचेंच पद्य निर्माण झालेलें आढळेल. (२) या वर्गाचा (किंबहुना आजवर प्रत्येक काळांत सत्ताधारी वर्गाचा) हितरक्षक म्हणून ठाकणारा उपाध्याय (ब्राह्मण) वर्ग हा सामाजिक, नैतिक व आर्थिक अशा सर्व दृष्टींनी बाकीच्या सर्व समाजघटकांवर सत्ता गाजवीत असे. वांशिक व नैतिक श्रेष्ठतेबाबत त्याची शासित वर्गालाच शिकवण असे, असें नव्हे, तर शासक क्षत्रिय वर्गाहूनहि. नैतिक व वांशिक दृष्ट्या श्रेष्ठ असल्याचा त्याचा दावा असावयाचा. या वर्गातूनच बहुतेक कवि यावयाचे व वरिष्ठ वर्गाबद्दल पूज्यभाव, त्यांच्याशी आज्ञाधारकत्व, त्यांचें निरपवाद श्रेष्ठत्व व त्यांना अर्थदान या गोष्टींचाच प्रकट वा प्रच्छन्न प्रचार त्यांच्या वाङ्मयांतून लोकांत केला जाई. मराठीपुरताच विचार करावयाचा म्हटल्यास मुकुंदराज-ज्ञानेश्वरापासून एकनाथ, तुकाराम, महिपती मुक्तेश्वर, मोरोपंत व अखेरच्या कवींपर्यंत कुणाच्याहि वाङ्मयाचें परिशीलन केल्यास या गोष्टींची प्रचीति येईल. क्षत्रिय व ब्राह्मण या दोन वर्गांचा वरपगडा सर्व वाङ्मयावर असल्यामुळे व समाजांत त्यांची श्रेष्ठता पटवून द्यावयाची असल्यामुळे त्यांच्याभोवती दैवीशक्तीचीं व अलौकिक चमत्कारांचीं वलयें निर्मिलीं जाणें अपरिहार्य नव्हे, बुद्धिपुरस्सर आवश्यक होतें. मराठी संत (मग जातीने ते ब्राह्मण वा अब्राह्मण असोत) याच वर्गात समावेशिले जाण्यास प्रत्यवाय नाही. या ठिकाणीं एक गोष्ट सांगितली पाहिजे, ती ही की, त्या त्या संतांच्या सदाचाराबद्दल व पापभीरुतेबद्दल संशय व्यक्त करणें हा या प्रतिपादनाचा अर्थ नव्हे; तर त्या त्या समाजरचनेंतून व शासकवर्गाच्या हितसंबंधांतून ज्या तात्त्विक विचारसरणी निर्माण होतात, त्यांची मौलिकता ठरविणें हाच प्रस्तुतचा उद्देश आहे. रसायनशाळेत अमूक एखाद्या द्रव्याचें गुणधर्म आपण सांगतों, तेव्हा पृथकरण व सिद्धान्तिकरण या व असल्याच तर्कशुद्ध मार्गांनी आपले निर्णय घेतले जातात व ते ज्ञानाच्या त्या अवस्थेपर्यंत तरी सत्य मानलेच पाहिजेत, तद्वत्, वाङ्मय ज्या परिस्थितींत व समाजरचनेच्या विशिष्ट चौकटींत निर्माण झालें, तिचें व वाङ्मयाचें सशास्त्र पृथकरण करून निर्णय घेणें इष्ट आहे. महिपतीच्या ' भक्तविजया ' सारख्या ग्रंथाचे अवतार या उपाध्यायवर्गाचें महत्त्व प्रस्थापित करण्यासाठीच आहेत, यांत संदेह नाही. तत्कालीन समाजांतील भोळसटपणाला दिलेलें उत्तेजन, दैवी चमत्कारांवरील आत्यंतिक विश्वासाचें समर्थन, भ्रामक समजुती, प्रारब्धवाद, यांचा आढळ अशा ग्रंथांच्या पानोपानीं होतो, तद्वतच तत्कालीन समाजाच्या एका महत्त्वाच्या अंगावरहि या कथांनी प्रकाश पडतो. तें म्हणजे उपाध्याय (ब्राह्मण व धार्मिक संप्रदाय) संस्थेचें तत्कालीन वरिष्ठ व बव्हंशीं दैवी महात्म्याने युक्त असें स्थान. ब्राह्मण या शब्दाने आज आपणांला विशिष्ट जातिसंस्थेची कल्पना येते, कारण आज तिचें केवळ जातिसंस्थात्मक रूपच उरलें आहे; परंतु विद्यादान, विद्याग्रहण, देवालय संस्थेवरील व धर्मकृत्यांतलि अधिकार, सामाजिक वरिष्ठता, दैवी माहात्म्य, या गोष्टींनी समर्थिलेली तत्कालीन ब्राह्मणसंस्था ही एक धार्मिक, सामाजिक व आर्थिक सत्तेची संस्था होऊन बसली होती. ब्राह्मणांबद्दलचा अंध आदर तत्कालीन समाजांतलि इतर सर्व वर्णांना पद्धतशीरपणें उपदेशिला जात असे व त्याचें तत्कालीन वाङ्मयांत पुरेपूर प्रत्यंतर मिळतें. हा कांही बाबतींत कवींचा प्रत्यक्ष दोष नसूनहि तत्कालीन समाजरचनेंतून उद्भवलेल्या विचारसरणीचें द्योतकच म्हणावा लागेल. जयदेवाची कथा याची साक्ष देईल. ' भक्त विजया ' च्या दुसऱ्या अध्यायांतील ' उत्तमामाजी उत्तम वर्ण। चार वर्णांत मुख्य ब्राह्मण,' हे उद्गार, राजाचा ग्रंथ फेकला जाऊन जयदेवाचा मान्य होणें, तिसऱ्या अध्यायांत भगवंतांची स्तुति करतांना केलेला ' ब्रह्मद्वेषी गोहत्यार' हा उल्लेख; ' की महापर्वकाळीं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दीन । अवचित घरा आला ब्राह्मण । तो अजापाळक म्हणोन । अव्हेरीला तुवां की' (३-१२०१), 'तुलसीदासाचिया पंक्तीं । सहस्र ब्राह्मण नित्य जेविती ।…… जनांत प्रशंसा झाली फार । द्रव्य आणूनि देती अपार । कनकपात्रें थोरथोर । रुपें अपार अगणित ।' (३-१५२), 'जाईल तरी जावो प्राण । ब्रह्मद्वेष न करावा जाण' (श्रीधर–पां. प्र., शांतिपर्व), विप्रांसी दक्षिणा अमित । न नेववे ऐसी दिधली' (पां. प्र. अ. ५८), 'एकेकास सव्वामण सोनें । एक पायली दिव्य रत्नें । एक घोडा एक गज त्यांकारणें । वस्त्रालंकारें देईजे ॥' (५८-१९) 'अश्व पाहिजे श्यामकर्ण । मूत्रपुरीष करी जेथें जाण । सहासहस्र गोदान । विधियुक्त तेथें करावीं ॥' (५८-२२, पां. प्र.)–इत्यादि उल्लेख ब्राह्मणांचें प्रस्थ तत्कालीन समाजांत किती मोठें होतें, तें दर्शवतात. ब्राह्मण निरिच्छ असतात, पण सज्जन प्रापंचिकांनी त्यांना सुवर्णाचें दान करावें, तें धन चोरांनी नेलें, तरी ब्राम्हणाचें धन म्हणून चोरांना तें 'पचत' नाही, कारण ब्राह्मणाचें धन चोरणाराचा सत्यानाश होतो, अशा प्रकारची शिकवण समाजाला देण्यांत येत असे. तुलसीदासाच्या घरांत चोरी करणारे चोर बाहेर जाऊंच शकत नव्हते, कारण देवानें पहारेकऱ्यांच्या रूपानें दारें अडवून ठेवलीं! शेवटी वैष्णवांच्या संगतीनें चोरांना देवदर्शन घडलें! ब्राह्मणसंस्थेइतकेंच वैष्णवादि वैदान्तिकांचेंहि प्रस्थ तत्कालीन वाङ्मयांतून दिसून येतें. उपास्य दैवताच्या वादावरून हिंदु धर्मांत शेकडों संप्रदाय व उपसंप्रदाय बोकाळून परस्परांवर ते कितीहि हिरीरीनें टीका करूं लागले, तरी भौतिक विश्वाबाबत सर्वांची एकवाक्यता! बहुजन समाजाच्या गळीं मोक्षाच्या नावाखाली कोणतें तत्त्वज्ञान उतरवायाचें, धार्मिक सांप्रदायिकांचें व ब्राह्मणांचें प्रस्थ कसें टिकवावयाचें, अर्थशोषणाचा आपला अधिकार पर्यायानें कसा जनतेच्या गळीं उतरवावयाचा-याबाबत सर्वांचें एकमत!

धार्मिक सांप्रदायिकांची श्रेष्ठता व नैतिक अधिकार बहुजनांच्या गळीं उतरवला जात असला, तरी बहुजन त्यांच्या अर्थशोषणास व अनाचारास कंटाळून कसे प्रतिकार करीत, याचें प्रत्यंतर सुद्धा तत्कालीन वाङ्मयांत (अर्थात् पर्यायानें!) मिळतें. महिपतीच म्हणतो, 'श्रीराम भजनीं विमुख जन। विष्णुभक्तांचें करिती छळण। त्यांसि अकस्मात उचलून। कुत्सित न्हाणींत टाकिती।' (भ. वि., ३-२८९). याच्या पुढील ओवींनच तत्कालीन बांडगुळांनी बुरख्यांआडून बहुजनांच्या चालविलेल्या पिळवणुकीवर विदारक प्रकाश पडतो — 'शेट सावकार दुर्जन। कदा न करिती अन्नदान। त्यांचीं भांडारें फोडून। घेऊनि जाती वानर' (३-२९०). ब्राह्मणांना व वैष्णवांना अन्नदान न करणाऱ्या शेट-सावकारांवर मात्र भडकून महिपतीनें त्यांचें द्रव्य लोक लुटून नेतात, या वस्तुस्थितीची आपल्या धार्मिक परिवेषास साजेशी मीमांसा केली आहे! पण त्यांतून आधुनिकांना लाभणारा बोध बिचाऱ्या महिपतीच्या ध्यानींमनींहि नसावा!

क्षत्रिय व धार्मिक वरिष्ठ यांच्या अनाचाराचे असे अनेक पुरावे मिळतील. महिपतीचाच पुन्हा दाखला घेतल्यास गोणाईच्या तोंडचे पुढील उद्गार पाहा—

'नाना परीचे कष्ट करूनी। कुणबी पिकविती जैसी धरणी। आयताचि राजा दंड करूनी। होतसे धनी वाटिया' (भ. वि. ४-१६६). एवढें असूनहि वर कवीचा उपदेश आहेच — 'द्रव्यावाचोनि राजदर्शना। जाऊं नयेचि सर्वथा।' (४-१२२); 'यापरी करूनिया स्तवन। बोलाविले गांवींचे ब्राह्मण। द्रव्यसामग्री वस्त्रेंभूषण। द्विजांकारणें दीधलीं' (४-२५०), 'नाही म्हणतां ब्राम्हणांसी। हानी सत्त्वासी होईल' (५-८९). आणि, या वरिष्ठ वर्गाच्या दैवी माहात्म्यावर विश्वास न ठेवणाऱ्या 'अभक्तां' (?) वर कोरडे ओढण्यांतहि सर्व 'संताळे' कवि एक होतात– 'अभक्त द्वेषी निंदिती वायस। नाही (संतचमत्कारांबद्दल) विश्वास ज्यांचे चित्तीं।,' त्याचप्रमाणे वेदान्तव्यतिरिक्त इतर, विशेषतः भौतिक, विचारसरणींची निंदा करण्यांतहि, एरवीं शत्रु असलेले, भिन्नसंप्रदायी एक होतात— 'वेदान्ताचें पुस्तक देऊन। कोकशास्त्र आणिलें';

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वैराग्य टाकून प्रपंचाकडे वळणाऱ्या लोकांस ' आयुष्यहीनासि औषध देऊनि व्यर्थ. '

(३) स्त्रीवर्गाविषयींचा सरंजामदारी समाजव्यवस्थेंतला दृष्टिकोन देखील उपर्युक्त प्रकाराचा पूरक असाच असल्यामुळे उपभोगाची व मालकीची एक वस्तु यापलीकडे स्त्रीला समाजांत स्थान कधींच नव्हतें; अतएव, वाङ्मयांतहि तिच्या याच भूमिकेचें प्रत्यंतर मिळतें. अगदी ' न स्त्रीः स्वातंत्र्यमर्हति ' म्हणून गर्जणाऱ्या मनूकडेच यासाठी बघावयाचें कारण नाही. आबालवृद्ध स्त्रीपुरुषांसाठी सन्तांनी व प्राचीन कवींनी काव्यें लिहिलीं, असें म्हणणारे, त्याचप्रमाणें, ' सन्तवाङ्मय हेंच खरें पुरोगामी ' म्हणून अटीतटीवर येणारे जीर्णाभिमानी त्या वाङ्मयांतील ' संभोग ' ' सुरतयुद्ध ', ' रेत ', ' भोगणें ', इत्यादि गोष्टींची प्रकट रीत्या केलेलीं फाजील वर्णनें वाचतांना पाषाणवत् वैराग्यानें तरी युक्त असले पाहिजेत, असें मानणें भाग आहे! एकूण, विशिष्ट हितसंबंधांसाठीच हेंहि वाङ्मय उत्पन्न झालें होतें. असें म्हणावयाला पाहिजे. लोलिंबराजाचें 'रत्नकलाचरित्र,' 'बिल्हणचरित्र' वगैरे काव्यांतली स्त्रियांच्या स्तन, मांड्या, वगैरे भागांचीं घोळून घोळून केलेलीं तींच तींच उत्तान वर्णनें व सुरतविलासाच्या प्रसंगांचे वारंवार केलेले उतारे हींच स्त्रियांबावतच्या हीन अभिरुचीचीं द्योतक म्हणून पुढे करावयाला हवींत, असें नाही; बाकीच्या वाङ्मयांतहि चट्सारा तोच प्रकार कमीअधिक प्रमाणांत, प्रकट वा प्रच्छन्न स्वरूपांत आढळतो. शृंगाराची व शृंगाररसाची तत्कालीन कल्पना यापलीकडे गेलेलीच नव्हती! ' अंबरगत परि पयोधरातें ' म्हणून तुणतुणें छेडणाऱ्या ' वेदान्ती ' लावणीकाराने व त्याच्या समव्यावसायिकांनी यावर कळस चढवला! स्त्रियांबद्दलचा वैष्णवांचा दृष्टिकोन महिपतीइतका दुसऱ्या कवीनें क्वचितच यथार्थ वर्णिला असेल. तुलसीदासपत्नीच्या तोंडीं महिपतीनें पुढील ओव्या घातल्या आहेत—' माझा काम धरून। रात्रीं आलासि धांवोन। परी आम्हां स्त्रियांचे संगतीन। नाश बहुत पावले॥ अहेल्या सुंदर देखोन। इंद्र पातला लुब्ध होऊन। आम्हां स्त्रियांचे संगतीन। नाश बहुत पावले॥ सीतेचा मनीं धरितां काम। नाश पावला रावण। आम्हां स्त्रियांचे संगतीन। नाश बहुत पावले॥ दीपाची झगमग देखोन। पतंग मरण पावती जाण। तेवीं स्त्रियांचे संगतीन। नाश बहुत पावले॥ ' इत्यादि.

वर्ण्य कथेंघाशीं संबंध नसूनहि स्त्रियांबाबतचा ' उपदेश ' करण्यासाठी श्रीधरानें आदिपर्वाच्या ४ थ्या अध्यायांत शकुंतला माता झाल्यावर तिनें माहेरीं न राहण्याबद्दल सांगतांना स्त्रियांबद्दल एक प्रवचनच आरंभिलें आहे. पतिव्रता स्त्री कोणती, त्याज्य कोणती, हें सांगण्यांत व स्त्री हें अनर्थांचें मूळ म्हणून प्रतिपादण्यांत त्यानें २७ ओव्या खर्ची घातल्या आहेत! त्यांतील ' चौथें मद्य तें कामिनी। दुर्गन्धि नाहाणी पापाची ' ही अत्यंत हीन कल्पना संप्रदायप्रवर्तकाची पदवी वाहणाऱ्या ' सर्वज्ञ ' चक्रधराच्याहि सूत्रांत आढळून येते!

(४) ऐहिक गोष्टींबाबत या काळांत दोन परस्परपोषक विचारसरणी मांडलेल्या दिसतात. वेदान्त व कोकशास्त्र हीं अनुक्रमें परलोक व इहलोक यांचीं प्रतीकें मानणाऱ्या वरिष्ठ धार्मिक सांप्रदायिकांनीच आपणांला अमुक अमुक द्यावें, श्यामकर्ण वारू जेथे म्हणून मलमूत्रोत्सर्ग करील त्या ठिकाणीं ब्राह्मणांना सव्वा मण सोनें वगैरे अर्पावें, म्हणून उपदेश करण्याची संधि वाङ्मयांतून केव्हांहि दवडलेली नाही. ऐहिक विश्वाची खंत करणाऱ्या जनांना व तात्त्विकांना ' वायस ', ' श्वान ', ' तमोगुणी पशुसमान ', ' टवाळ ', वगैरे शिव्या हासडणाऱ्या धार्मिक वरिष्ठांनी आयतीं मिळवलेलीं धनें चोरांपासून रक्षण्यासाठी विष्णूला दाराशी पहारेकरी बनवण्याचें दुसरें कोणतें कारण होतें? वेदान्ताबाबत मतामतांचा गलबला माजवणाऱ्या या वाचिवीरांची समाजाला करावयाच्या उपदेशाच्या ' ड्राफ्ट 'बाबत मात्र एकवाक्यता व्हावी, हें आश्चर्य नव्हे! ' बापरे न चुके होणार ', ' अहो होणार बळवंत। हरिहरांसी टळेना ', इत्यादि शेकडों वचनांतून व्यक्त होणारा प्रारब्धवाद समाजाच्या गळीं उतरवण्यासाठी या वाङ्मयाचा पद्धतशीरपणें उपयोग करून घेण्यांत येत होता.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(५) प्राचीन मराठी काव्यांत सर्वसाधारण मानवीजीवन वा अर्थव्यवहार यांबाबत प्रकट वा प्रच्छन्नपणें व्यक्त होणारी विचारसरणी कांहींअंशीं वर येऊन गेली आहे. या काळांतील वाङ्मयाचा बव्हंश गीतेंतील कर्ममार्गी तत्त्वज्ञानावर प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीत्या आधारलेला आहे. वरिष्ठवर्गाचें श्रेष्ठत्व प्रतिपादण्याबरोबरच बहुजनांची त्या वर्गाकडून होणारी आर्थिक व सामाजिक पिळवणूक चालू राहावी, या रोखानेच या वाङ्मयांतून प्रचार केलेला आढळतो.

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' (कर्म कर, तेवढाच तुझा अधिकार आहे. फळावर तुझा अधिकार नाही) या गीतेंतील वचनाचा वरिष्ठवर्गीय वाङ्मयांत (अर्थात् बहुजन समाजासाठी) अतिशय उदोउदो केलेला आहे; व सरंजामदारी समाजव्यवस्थेस तें धरूनच आहे, यांत शंका कसली? वैष्णवांना वा ब्राह्मणांना इच्छित तें देण्यासाठी वाण्याच्या पलंगावर स्वपत्नीला पाठवणारा कबीर (महिपतीकृत 'भक्तविजय') आदर्श वैष्णव मानलेला असून त्याकाळीं अशा प्रकारचीं उदाहरणें प्रजेच्या जीवनांत घडत होतीं, हेंच यावरून दिसून येतें. लेखक प्रापंचिक असो वा विरक्त असो, तो ज्या काळांत लेखन करतो, त्या काळच्या समाजजीवनाचें प्रतिबिंब त्याच्या लेखनांत प्रत्यक्षाप्रत्यक्ष स्वरूपांत उतरतें हा नेहमीचा अनुभव आहे. या व याच्याच समान्तर उदाहरणांनी केशवसुत–महाजनींच्या पूर्वीचें, विशेषतः आङ्ग्लपूर्व, वाङ्मय खचून भरलेलें आहे. नाही म्हणावयाला, 'ब्रह्मा वेडझवा म्हणून विभवा देतो अशा गाढवां' म्हणून धार्मिक व श्रीमंत वर्गास फायलावर घेणारा वऱ्हाडांतला देवनाथ कवीच काय तो या गोष्टीस अपवाद दिसतो!

लेखक वा कवि वरिष्ठ वर्गांतला असो, वा अतिशूद्र गणल्या गेलेल्या वर्गांतला असो, त्याच्या काव्यांतली या काळांतली विचारसरणी एकच आहे. अतिशूद्रांतले कवि झाले, म्हणून तेवढ्याने तें जनतेचें वाङ्मय होत नाही. शासित अतएव दलितवर्गाला उदयोन्मुख करणारें भावात्मक वाङ्मय हेंच त्या त्या काळचें जनतावाङ्मय होय. या दृष्टीने पाहतां चोखामेळा, जनाबाई, तुकाराम वगैरे कवींनी आपल्या वर्गाचें भावात्मक चित्रण करावयास हवें होतें; पण ते सरंजामदारी व्यवस्थेंत मुरलेले होते, त्या व्यवस्थेचे संस्कार त्यांच्या मनांवर झालेले होते; म्हणूनच 'मी तुमच्या महाराचा महार' म्हणून 'पाटी आणिली उष्ट्यासाठी' अशी करुणा भाकणारा चोखामेळा, स्वतःचें व्यक्तिशः व वर्गशः हीनत्व मान्य करणारे सेना न्हावी वा गोरा कुंभार व भोंदू सन्तांना व ब्राह्मणांना शिव्या हासडूनहि 'टोणपा ब्राह्मण असेल साचा, तरी आठ वर्णांचा तो गुरू' (मुकुंदराज चरित्र-महिपती) असें म्हणणारे महिपती–तुकाराम यांचें वाङ्मय हें तत्कालीन बहुजनसमाजाचें भावात्मक नसून खरोखर अभावात्मक चित्रण होय, असेंच म्हणावें लागेल व या विधानाची सत्यता नाकारणें प्राचीन काव्याच्या अभिमान्यांनाहि जड जाईल. सांगण्यांतलें ऐंदपर्य एवढेंच की, केशवसुत–महाजनीपूर्वीचें मराठी काव्य हें सरंजामदारी समाजव्यवस्थेचें प्रातिनिधिक असें होतें.

इतर आनुषंगिक व गौण मुद्यांचा विचार विस्तारभयास्तव बाजूला ठेवल्यास प्रत्यवाय नाही. तथापि झाला एवढा विस्तारहि केशवसुतांच्या काव्याच्या मूल्य–मापनाच्या दृष्टीने आवश्यक व अपरिहार्य आहे. यानंतर, केशवसुत–महाजनी यांच्या कांहीं वर्षें अगोदर व त्यांच्या समकाळांत ज्या नव्या युगाची, नव्या ध्येयाची, नव्या सामाजिक व नैतिक मूल्यांची, पाऊलवाट तयार केली जात होती, तिचा विचार करणें प्रस्तुत आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आधुनिक कवितेच्या निमित्ताने—

प्रा. पुरुषोत्तम शिवराम रेगे,
बी. एस्‌ सी. (लंडन)

● मुंबईचे प्रा. रेगे हे वैशिष्ट्यपूर्ण कविता लिहिणारे कवि म्हणून प्रसिद्धच आहेत. या लेखांत त्यांनी काव्य व त्यांतहि अलीकडील मराठी काव्य यां विषयी निर्भीड विचार प्रगट केले आहेत. 'अंगार,' 'क्रांति,' 'मानवता,' – वगैरे घोषणा करणाऱ्या कवींच्या कविता प्रायः उथळ व उसन्या आवेशाच्या असतात; असा स्पष्ट आरोप प्रा. रेगे यांनी केला आहे!

* * *

माझ्या कवितेसंबंधीच्या कल्पना मीं बऱ्याच जणांशीं ताडून पाहिल्या. परंतु समाधान झालें नाही. काव्यशास्त्रावरील टीकाग्रंथहि जसें मिळाले तसे अधून मधून चाळून पाहिले. त्यांचें अभ्यासू वृत्तीने जसें परिशीलन करायला हवें, तसें मात्र कांही अद्याप झालेलें नाही. ए. ई. हाउसमनचें "द नेम अँड नेचर ऑफ पोएट्री" हें छोटेसें व्याख्यान पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेलें आहे. त्यांतील विचारसरणी बरीचशी पसंत पडली. उत्तम काव्य वाचलें की, पोटांत कसेसेंच होतें. हाउसमनच्या मतें हीच खरी काव्याची कसोटी. हृदय वगैरे हा भावनांच्या आधुनिक सजावटीचा भाग. आपल्या इकडे सुद्धा 'पोटांत शिरणें' 'पोटांतलें काढून घेणें' 'ओठांत एक, पोटांत दुसरें'–वगैरे जुने वाक्प्रयोग हेंच दाखवितात. चिनी लोकांत सुद्धां पोट हेंच भावनांचें स्थान मानलें जातें, असेंहि कोठेसें वाचल्याचें आठवतें. हाउसमनचें पुस्तक मुद्दाम वाचावें.

माझ्या मतें 'काव्य' आणि 'अ-काव्य' यांच्या सीमा टीका शास्त्राचे दंडक घेऊन ठरविणें जवळ जवळ अशक्यच आहे. पण म्हणून हा खटाटोप करूं नये, किंवा कोणी करणार नाही, अशांतला मात्र भाग नाही. मानवी मनाच्या प्रकृतीला तें धरून होणार नाही. जें गूढ त्या-बद्दल कुतूहल वाटणें, त्याची चिकित्सा करून, कार्य–कारणसंबंध, वर्गीकरण–इत्यादि शास्त्रीय चौकटींत तें बसविण्याचा प्रयत्न करणें अगदी साहजिक होय. कोलरिजने काव्याची 'मेमोरेबल स्पीच' अशी व्याख्या केली आहे. शब्दांना एक प्रकारची धार असते, त्यांच्या जोडणीला कांही अंतर्गत नियम असतात. आणि, म्हणूनच उत्तम काव्यांत शब्दयोजना इतक्या यथातथ्यतेने केलेली असते की, इकडचा शब्द तिकडे फिरवितां येत नाही, किंवा एका शब्दाऐवजी दुसरा वापरतां येत नाही. थोड्याशा विरोधाभासाने असें म्हणतां येईल की, शब्दयोजना इतकी अन-पेक्षित हवी की, वाचकाला तीच स्वाभाविक वाटायला हवी. पण म्हणून काव्य म्हणजे समर्पक शब्दयोजना एवढेंच समीकरण मांडणेंहि ठीक होणार नाही. या शब्दयोजनेंतून निघणाऱ्या वेगवेगळ्या अर्थलहरींत काव्याचा आत्मा असतो. उत्तम काव्य पुनःपुन्हा वाचावेंसें वाटेल. तें जवळ आहे आणि वाटेल तेव्हा वाचतां येईल या गोष्टींतच मनाला आनंद वाटेल. हार्डी किंवा वॉल्टर द ला मेअर यांच्या कविता म्हणूनच जवळ असाव्याशा वाटतात. अशा निकट सहवासाच्या कसोटीला जें काव्य उतरतें, तेंच खरें काव्य.

येथपर्यंत फारसे मतभेद होतील असें वाटत नाही. पण प्रत्यक्षांत जें रुचिवैचित्र्य दिसून येतें, त्याची कशी काय संगत लावायची? प्रत्येक कलेच्या रसग्रहणाची मीमांसा करतांना हा प्रश्न नेहमीच आडवा येतो. एकाला आवडतें तें दुसऱ्याला आवडत नाही; आज ज्याला नाकें मुरडलीं जातात, तें उद्या डोक्यावर घेऊन नाचलें जातें–किंवा कधी याच्या अगदीं उलट!—हे प्रकार नेहमीच चालू असतात. विदग्ध वाङ्मयाला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणूनच काळाची कसोटी लावतात. शाश्वत सत्य (आणि किंवा सौंदर्य) असल्याशिवाय कोणतेंच वाङ्मय चिरकाल टिकून रहात नाही, असा हा सिद्धांत आहे. (सत्य आणि सौंदर्य यांच्या चर्चेत इथें पडण्याचें कारण नाही.) काळाची ही कसोटी स्थूल मानानें मान्य केली, तरी जें सर्व टिकलें आहे, तें विदग्ध, असें नेहमीच म्हणतां यावयाचें नाही — मुद्रणसुलभ युगांत तर मुळीच नाही. शिवाय असेंहि विचारतां येईल की, कांही काळ किंवा एका विवक्षित परिस्थितींत जें आवडलें, तें चिरकालीन कसोटीचा निकष लावून खरोखरच कमी प्रतीचें ठरवितां येईल काय? मला वाटतें की, आनंद हा नेहमीच एकजिनसी असतो. सोयीसाठी आपण त्याच्या अवस्था किंवा पायऱ्या ठरवितों, पण त्या बाह्य, व्यावहारिक परिस्थितीचे नियम लावून. सुंदर फुलाला पाहून झालेला आनंद, खूप मनाप्रमाणे खेळल्यानंतर वाटणारा आनंद, सर्कशींतल्या विदूषकाचा विनोद पाहून वाटणारा आनंद, भक्तांच्या मेळ्यांतील हरिनामाचा गजर ऐकून होणारा आनंद (किंवा आजच्या जमान्यांतील 'जय हिंद'चा घोष)—यांची प्रतवारी कशी लावावयाची? लावली तर ती उपयुक्ततेचे माप घेऊनच ना? आणि, एकदा उपयुक्तता विचारांत घेतली की, आनंदाचें निर्लेपत्व टिकून राहूं शकतें का?—हे तात्त्विक प्रश्न मी नुसते उपस्थित केले आहेत. मला भासणाऱ्या त्या अडचणी आहेत.

तेव्हा काव्य आणि अ-काव्य ठरवितांना या सर्व भानगडींत न पडतां मी नेहमी एक साधा नियम लावित असतों; हें गीत, ही कविता, या ओळी पुन्हा वाचाव्याशा वाटतात काय? वाचाव्याशा वाटल्या, तर माझ्यापुरतें मी तें काव्य समजतों. मग त्यांत प्रचार, प्रक्षोभ किंवा दुसरा कांही 'प्र'कार नसला, तरी चालेल. आणि मग आपलें आधुनिक मराठी 'काव्य' पाहिलें की, मन उदासीन होतें. याला मुख्य कारणें दोन असूं शकतील. आजची कविताच कमी दर्जाची असेल (म्हणजे पूर्वीची उच्च दर्जाची होती, असा मात्र अर्थ नव्हे); किंवा रसिकमनाच्या वाढत्या अपेक्षा पुऱ्या करावयाला ती असमर्थ असेल. मला स्वतःला हें दुसरें कारण अधिक सयुक्तिक वाटतें. स्थूलमानानें आधुनिक मराठी कवितेंत चार प्रमुख प्रवृत्ती दिसून येतात: (१) 'अंगार-अश्रु-रक्त-चिंधड्या'-काव्य-श्रीकृष्ण पोवळे, कृ. ब. निकुंब, वसंतराव चिंचडे इत्यादि कवींनी हा विषय इतका चिवडला आहे की, निदान आणखी कांही वर्षें तरी मराठी कवितेला तो पुरून उरेल! खेदाची गोष्ट ही की, यांतील बहुतेक आवेश उसना असतो! आणि, तो उसना आहे—केवळ शाब्दिक आहे—हें तावडतोब कळतें. या सदरांतील बरेचसें काव्य वाचून भावना थरारून उठण्याऐवजी एक प्रकारची सुस्त चिळसच अधिक वाटते. [२] 'मानवता-क्रांति'-काव्य—आ. रा. देशपांडे व ना. ग. जोशी हे या काव्याचे प्रमुख पुरस्कर्ते आहेत. कवीच्या सामाजिक भूमिकेवर या लोकांचा जोर असतो. आधुनिक काळांतील ध्येयें कवीने आत्मसात् केलीं पाहिजेत व समाजद्रष्टा म्हणून मार्गदर्शन केलें पाहिजे, असा यांचा दावा असतो. आता, प्रत्येक कलाकाराला कांही तरी सांगावयाचें असतें; पण तें सहज झालें, तरच त्यांत गंमत असतें. प्रचारकाचा थाट घेतला की, चांगली कलाकृतीहि बिघडते. याचें ताजें उदाहरण म्हणजे आ. रा. देशपांडे यांचें 'निर्वासित चिनी मुलास' हें दीर्घ-काव्य. यांतील कांही परिच्छेद निव्वळ निबंधवजा वाटतात. प्रचारकाचीं वस्त्रें चढविलीं की, काव्य कसें झाकळून जातें, हें आ. रा. देशपांडे यांच्या हल्लीच्या काव्यांत दिसून येतें, असें खेदानें म्हणावें लागतें. त्यांचा 'पेरते व्हा' मानवाला "पेरा, पेरा, पेरते व्हा"-असा ओरडून संदेश देतो, यांतच त्यांच्या हल्लीच्या भूमिकेची फलश्रुति दिसून येते. (३) 'पारिजात' काव्य-यांत जुन्या ओवी काव्याची नकल आढळून येते. या काव्यांत नवीन दृष्टि क्वचितच आढळते. तेच ते संकेत, शब्दप्रयोग वगैरे आढळतात. बहुतेक सर्व चालू कवींनी हा काव्यप्रकार हाताळला आहे. नवशिक्के कवि याचा फार उपयोग करतात. (४) खोटीं जानपद गीतें—जुन्या जमान्यांतील यशवंत-गिरीशादि कवींनी ही प्रथा सुरू केली. 'लइ,'

'बंगाळ'–वगैरे शब्द माफक प्रमाणांत पेरून शहरी भावना खेडवळांच्या तोंडांतून वदविण्याचा हा प्रयत्न होता. नंतर इतरांनीहि त्याचा अवलंब केला. मध्यंतरीं नाखवा गीतांचीहि अशीच एक लाट येऊन गेली. रेडिओ व ध्वनिमुद्रिकांमुळे यांना फार भाव आला. मराठी काव्याचें सर्वांत जास्त नुकसान या बेगडी काव्यानें केलें !

या चारहि काव्यप्रकारांत एका बाबतींत साम्य दिसून येतें. आणि, तें म्हणजे त्यांतून पदोपदीं जाणवणारा उथळ आणि उसना आवेश ! याला क्वचित् कांही अपवाद सापडतील. पण साधारण परिस्थिति ही अशी आहे ! रसिकमनाच्या वाढत्या अपेक्षा पुऱ्या करावयाला आधुनिक काव्य त्यामुळे असमर्थ झालें आहे. थोड्याफार फरकानें हीच परिस्थिति ललित – वाङ्मयाच्या इतर क्षेत्रांतहि–लघुकथा, कादंबरी, निबंध इ.–जाणवते. सामान्य रसिक 'फिल्मी' संगीत आणि अधूनमधून सुरेल चालीवर रेडिओवर किंवा ध्वनिमुद्रिकेवर गायिलेल्या कवितांवर खूष असतो. असल्या संगीताचे आणि काव्याचे आता एक ठराविक तंत्र झालेलें आहे, हे थोड्याशा श्रमाने प्रत्येकाला कळून येईल. त्यांतून संगीतहि निष्पन्न होत नाही आणि काव्य तर नाहीच नाही ! रेडिओ किंवा ध्वनिमुद्रिका कंपन्यांचे म्युझिक डायरेक्टर यांची कुवत ज्यांना माहीत आहे, त्यांना हें असें कां होतें, तें वेगळें सांगावयाला नको. लोकांना काय आवडेल या नांवाखाली हे लोक आपल्याच आवडीचें चोज पुरवीत असतात ! आणि, त्यांची आवड तुटपुंज्या क्षेत्रांतच घोटाळत असते ! फिल्मी संगीत लोकप्रिय होण्याचें मुख्य कारण त्यांतील संगीत हें नव्हे. हें संगीत प्रामाणिक नव्हे याची कवीपासून प्रेक्षकांपर्यंत सर्वांची खात्री झालेली असते आणि म्हणून त्यांतून फुलणाऱ्या नकली जगांत सर्वच सारखे रमूं शकतात. चालू युगांतलें खरें लोककाव्य तें हें !

याचा अर्थ मात्र असा नव्हे की, आधुनिक कवींनी सरसकट या काव्याच्या मागें लागावें. तें शक्य कितपत होईल हाहि एक महत्त्वाचा मुद्दा आहे. माझ्या मतें, मराठी कवितेंतील आजचा गोंधळ कवींना आपली भूमिका नीट न समजल्यामुळे माजला आहे. कवि म्हणजे भाट ही यशवंतादि रविकिरण मंडळांतील लोकांनी भूमिका घेतली. (त्याचसाठी काव्यगायन !) त्याची प्रतिक्रिया म्हणून आज कांही जणांनी क्रांतीची भूमका उठविली आहे ! पण दोघांच्याहि बैठकींत जिवंतपणा नसल्यामुळे–खरा अंतरीचा जिव्हाळा नसल्यामुळे–त्यांच्या कवितेंत बहुजन समाजाशीं केलेली फाजील लगट तेवढीच दिसून येते ! कारण जर खरा जिव्हाळा असता, तर बहुजन समाजानें फिल्मी संगीत गाण्याऐवजीं यांची 'क्रांति गीतें' आणि 'भलरी गीतें' गायिलीं असतीं ! कवि भाट नाही आणि क्रांतिदेवतेचा पुजारीहि नाही. तो एक अत्यंत आत्मनिष्ठ अशी व्यक्ति आहे. स्वतःशी जो इमान राखील, तोच खरें काव्य लिहील. आधुनिक कवींना हें जेव्हा पटेल, तेव्हाच मराठी काव्याला सुदिन येतील !

• • •

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कवि आणि टीकाकार

वसंत अनंत शहाणे,
एम्. ए., एल्. एल्. बी.

● हैद्राबादचे कुशल लेखक रा. शहाणे यांनी एकच व्यक्ति कवि व टीकाकार दोन्ही असूं शकत नाहीं, हा सिद्धांत या लेखांत सरसतेनें प्रतिपादिला आहे.

* * *

सेनेका या सुप्रसिद्ध रोमन नाटककाराने म्हणे असे उद्गार काढले आहेत की, काव्याचा टीकाकार हा कवीच असला पाहिजे! अभिजात आदर्शांचा विलक्षण भोक्ता असलेल्या बेन जॉन्सनने सेनेकाचाच अनुवाद केला आहे. बेनने म्हटलेंच होतें : " काव्याचा टीकाकार हा खुद् कवीच असावयाला हवा ! "

बेन जॉन्सनच्या पावलावर पावलं टाकून त्याच्या उक्तीचा उद्घोष करणाऱ्या टीकाकारांनी एक पाऊल पुढं टाकून असं म्हटलं आहे की, " जगांतले उत्कृष्ट कवि हे भिकार टीकाकार असतात अन् दुनियेंतले श्रेष्ठ टीकाकार हे भुक्कड कवि असतात ! "

मानवी हृदयाच्या व बुद्धीच्या विशाल परिसरांत काव्याला असं कांहीं वेगळं, विशिष्ट व नाजूक स्थान या कवींनी प्राप्त करून दिलं आहे की, ज्यांना काव्य कळत नाहीं, त्यांनी या सवत्या सुभ्यावर आपली वक्रदृष्टि तिळमात्र वळवितां कामा नये! काव्यसृष्टि म्हणजे जणु विश्वामित्राची अपरसृष्टीच! आम्हींच कविता लिहिणार, वाचणार, गाणार, ऐकणार आणि आम्हीच त्या कवितांवर टीका करणार! पद्यांत गति नसणाऱ्या गद्य टीकाकारांनो, " खामोश ! "

आपल्या सवत्या सुभ्याच्या समर्थनार्थ या पंडितांनी पुढं केलेलीं प्रमाणं अवास्तव आहेत, असं मात्र म्हणतां येणार नाही. जगाच्या वाङ्मयांतून त्यांनी निवडलेलीं उदाहरणं त्यांच्या प्रमाणाची व सिद्धान्ताची साक्ष पटविण्यास पुरेशी नाहीत काय ?

पाश्चिमात्य शास्त्रांचा आद्य जनक जो ॲरिस्टॉटल त्यानं तर काव्यशास्त्रावर अगदी प्रथम एक महान् टीकाग्रंथ लिहिला आहे! ॲरिस्टॉटलची ' काव्यमीमांसा ' (' Poetics ') ही तर काव्यावरच्या टीकाप्रासादाची कोनशिला आहे! पण ॲरिस्टॉटलनं कधी कविता लिहिल्या होत्या की नाहीत, याला इतिहासांत कांहीं आधार नाही. बहुधा कवितेची एकहि ओळ त्याच्या हातून लिहिली गेली नसावी !

या उलट, प्लेटोची भूमिका आहे. प्लेटोचं काव्य फार सुंदर आहे, असं म्हणतात. पण काव्यासह इतर कलांची आपल्या आदर्श ' लोकराज्यां ' तून हकालपट्टी करणाऱ्या प्लेटोंतला टीकाकार अविवेकी होता, हें आता सर्वमान्य झालं आहे. उत्कृष्ट कवि भुक्कड टीकाकार असणारच, नाही का ?

हें समीकरण सप्रमाण सिद्ध करणं फारसं अवघड नाही. वर्डस्वर्थच्या कवितांचे विखुरलेले मोती वेचून काढले, तर वर्डस्वर्थ हा कविश्रेष्ठ ठरावयाला प्रत्यवाय उणार नाही. पण याच कविमहाशयांनी खरडलेल्या टीका वाचल्या की, असं वाटतं की, टीकेच्या वाकड्या अंगणांत कवींनी कधी नाचूं नये! जगभर गाजलेल्या ग्रेच्या विलापिकेला वर्डस्वर्थनं ' अनाकलनीय ' (unintelligible) ठरवून टाकलं आहे! गटे हा एकोणिसाव्या शतकांतला कविशिरोमणि; पण याच गटेला स्विनबर्ननं ' टाकाऊ टीकाकार ' म्हटलं आहे! मिल्टनसारख्या महाकवीनं जीं टीकास्वरूप भाष्यं लिहिलीं आहेत, त्यांतले कांहीं अपवाद वगळले, तर मिल्टनला उच्च टीकाकारांच्या वर्गीत घालतां येणार नाही. बायरन, शेले, कीट्स यांच्या कविता वाचून तुलनात्मक दृष्टीनं त्यांच्या टीका बघितल्या, तर उत्कृष्ट कवीला उत्कृष्ट

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

टीकाकार होतां येत नाही, हें सहज सिद्ध होण्यासारखं आहे.

उत्कृष्ट टीकाकाराला तरी उत्कृष्ट कवि कुठं होतां येतं? ॲरिस्टॉटलला तर कवितेची एकहि ओळ लिहितां आली नाही. बड्या व छोट्या स्कॅलिगरच्या कवितांचं आज कोण अध्ययन करतो? सुप्रसिद्ध फ्रेंच टीकाकार सेंट ब्यू याला कवितेंत कितपत गति होती? ब्यूला प्रमाण समजणाऱ्या मॅथ्यु अर्नोल्डच्या कविता त्याच्या अनन्य टीका कौशल्यापुढं चमकतील काय? डॉक्टर जॉन्सन्‌ला काव्यांत कितपत गति होती, हें कळावयाला त्याचं स्वतःचं काव्य वाचलंच पाहिजे, असं कांही नाही! त्याच्या टीका वाचल्या, तरी या महापुरुषांतला कवि खचित खलास झाला असला पाहिजे, अशी मनाला साक्ष पटल्यावाचून राहात नाही! मिल्टनच्या महाकवित्वाचीं मयूरपिसं नैतिकतेची 'काव काव' करणाऱ्या पोपला चिकटविणाऱ्या या माथेफिरू डॉ. जॉन्सनला कवि म्हणणाऱ्यांची कीवच केलेली बरी! रस्किनचं सौंदर्यशास्त्राच्या आणि चित्रकलेच्या टीकासृष्टींतलं स्थान अढळ आहे. रस्किननं अगदी प्रथम कविता लिहिण्याचाहि प्रयत्न करून पाहिला होता. त्याच्या आईवडिलांना तो दुसरा 'पवित्र बायरन' होईल, अशी आशा वाटत होती! पण रस्किनच्या सामान्य कवितांची इंग्लंडांतल्या 'दि पंच' या विनोदी मुखपत्रानं फार मोठी मार्मिक टिंगल केली आहे! जसा रस्किन, तसा वॉल्टर पेटर. मॅथ्यु अर्नोल्ड हा केवढा अधिकारी टीकाकार; पण काव्याच्या रसिकांना थोडासा अधिकार प्राप्त झाला असता, तर त्यांनी नैराश्यपूर्ण कविता रचण्याचा अर्नोल्डचा अधिकार केव्हाच काढून घेतला असता!

उत्कृष्ट कवि व उत्कृष्ट टीकाकार यांचा 'समसमा संयोग' झालेले महान् वाङ्मयसेवक जगाच्या वाङ्मयीन इतिहासांत अल्प प्रमाणांत आढळतात. इंग्रजी वाङ्मयांत कॉलेरिजचं केवढं तरी ठसठशीत उदाहरण या विधानाची साक्ष देण्यास पुरेसं आहे. सिडनेचं जानपदकाव्य व त्याच्या टीका यांत अधिक सुंदर कोणतं, याचं उत्तर देणं सोपं नाही. वर्डस्वर्थचे कान उपटणाऱ्या कॉलेरिजचं इंग्रजी टीकावाङ्मयाच्या इतिहासांतलं स्थान खरोखर अनन्य आहे. शेक्सपियरच्या टीकाकारांच्या संप्रदायांत हॅझलिटच्या शेजारीं कॉलेरिजने बैठक मारली आहे. कॉलेरिजनं लिहिलेल्या कवितांची संख्या अत्यल्प असली, तरी आपल्या गुणांच्या बळावर इंग्रजी कविमंडळांतलं मोहऱ्याचं स्थान त्यानं पटकावलं आहे!

मराठी वाङ्मयाची उपासना करणाऱ्या वाङ्मयभक्तांच्या भूमिका अजमावून पाहिल्या, तर काय दिसून येईल? हें पाश्चिमात्य टीकाशास्त्राचं प्रमाण मराठी वाङ्मयाला व वाङ्मयभक्तांना कितपत लागूं पडतं?

'निबंध मालाकार' चिपळूणकर हे मोठे अधिकारी टीकाकार खरे, पण, त्यांना उसन्या आदरभावनेनं 'श्रेष्ठ कवि' म्हणण्याचं धाडस कोण करील? वासुदेवशास्त्री खऱ्यांच्या नुसत्या कविता वाचून गद्याच्या क्षेत्रांत हा कवि एक महान् पंडित असावा, ही कल्पना दृढ होते. डॉक्टर जॉन्सन्‌प्रमाणं बाळकृष्ण अनंत भिड्यांच्या नुसत्या टीका वाचल्या, तरी या अधिकारी टीकाकाराला काव्याचं अंग 'बेताचं' होतं, हें स्पष्ट होतं. "लेण्यांचें दर्शन" या कवितेंत भिड्यांनी ताजमहालाच्या निर्मात्यावर मूर्तिभंजनाचा व जुलमाचा आरोप केला आहे. हा आरोप खरा आहे, असं म्हणवत नाही. याउलट, वेरूळच्या लेणीं या आरोपापासून 'मुक्त' आहेत, असंहि म्हणतां येणार नाही. चिपळूणकरांनी टीकाकाराच्या अंगीं असावा लागणारा म्हणून सांगितलेला 'सहृदयता' हा गुण भिड्यांच्या अंगीं आढळत नाही. ज्याला 'सहृदय' टीकाकार होतां येत नाही, तो उत्कृष्ट कवि कसा होणार? रा. न. चिं. केळकर यांच्या मराठी साहित्यांतल्या सम्राट्पदाला त्यांच्या कवितांनी हातभार लावला, असं मला वाटत नाही. कै. श्री. कृ. कोल्हटकर पट्टीचे टीकाकार खरे, पण त्यांच्या कविता त्यांच्या टीकावाङ्मयापुढं निःसंशय फिक्या पडतील! रा. माडखोलकरांच्या कविता तर हाताच्या बोटावर,

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मोजण्याइतक्या आहेत. रा. क्षीरसागरांनी तर या प्रांतांत अद्याप पाऊलच टाकलेलं दिसत नाही. प्राध्यापक रा. श्री. जोगांचं उदाहरण मात्र या नियमाला 'अपवाद' म्हणून घालावं लागेल. जोगांच्या काव्याचा 'निदिगंध' त्यांच्या काव्या-वरील टीकेइतकाच मार्मिक व मधुर नाही, असं कोण म्हणेल? काव्याच्या व टीकेच्या प्रांतांत नांव घेण्याजोगी कामगिरी सारख्याच हिरीरीनं बजाव-णाऱ्या या अपवादात्मक वाङ्मयसेवकांत विदर्भा-तले रा. वा. ना. देशपांडे यांचं स्थान फार मोठं आहे.

पण प्रमाण असं आहे की, उत्कृष्ट टीकाका-राला उत्कृष्ट कवि होतां येत नाही. याउलट, उत्कृष्ट कवी सुद्धा उत्कृष्ट टीकाकार होऊं शकत नाही.

या प्रमाणाला अपवाद मोठे आहेत, पण अपवादाशिवाय नियम कसा सिद्ध होणार?

या सिद्धान्ताची पुरेपूर साक्ष पटविणारी अनेक उदाहरणं इंग्रजी व पाश्चिमात्य वाङ्मयांत आहेत. मराठी वाङ्मयाचा विकासहि या प्रमाणाची साक्ष देत आहे, असें मला वाटतें.

सेनेका व बेन जॉन्सन् यांनी कवितेच्या टीका-कारांना आपल्या उक्तींतून केलेला अहेर अशा रीतीनं खरा व खोटा ठरत आहे! काव्य ही सुद्धा अर्नोल्डनं म्हटल्याप्रमाणं जीवनावरची टीका असू शकेल, पण या 'जीवन-टीकेच्या' विस्तीर्ण क्षेत्रांतलं काव्याचं 'पाकिस्तान' आपण आता मानलं पाहिजे! या सवत्या सुभ्याचं पहिलं सूत्र असं आहे की, कवितेवर टीका लिहिणारा प्राणी हा स्वतः कवि असला पाहिजे! कवींखेरीज इतरांना काव्यांत काय कळणार कपाळ!

म्हणतात ना, स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसणार नाही! काव्याच्या स्वर्गसृष्टीला हाच नियम लागू आहे की काय, कोणास ठाऊक!

* * *

साहित्य आणि संगीत

वि. ज. सहस्रबुद्धे

● मिरजचे साहित्यिक रा. सहस्रबुद्धे यांनी या लेखांत साहित्य व संगीत यांचा संबंध परस्परांस पोषक कसा आहे, हें थोडक्यांत विशद केलें आहे.

* * *

साहित्य आणि संगीत या विषयावर मिरज येथील दक्षिण-महाराष्ट्र-साहित्य-संमेलनांत व पुणें येथे झालेल्या संगीत-परिषदेमध्ये चर्चा झाली असून नियतकालिकांतूनहि याविषयीं त्रुटित विचार प्रदर्शित झाले आहेत. तथापि अजून हा विषय वादग्रस्त दिसतो व या विषयाकडे गाय-कांचें व साहित्यिकांचें जावें तितकें लक्ष्य गेलेलें नाही, म्हणून या संबंधी कांही विवेचन करण्याची आवश्यकता आहे.

या बाबतीत दोन पक्ष आहेत, हें उघड आहे व तसे दोन पक्ष आहेत, म्हणूनच वाद आहे व चर्चेचा प्रसंग येऊं शकतो. एक पक्ष संगीताचा साहित्याशीं बिलकुल संबंध नाही व संबंध असण्याची जरूरीहि नाही, असें प्रतिपादणारा असून दुसरा पक्ष म्हणतो की, साहित्य व संगीत यांचा परस्पर संबंध आहे व तो संबंध परस्परांस उपकारक व पोषक असाच आहे. यांपैकी पहिला पक्ष विशेष

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महत्त्वाचा आहे व त्याचे म्हणणें कितपत सयुक्तिक आहे व त्यांत सत्यांश असला तर किती आहे, या दृष्टीने त्याचें म्हणणें विचारांत घेण्याचें आहे. त्याचा कांही निर्णय लागेल, तर मग दुसऱ्या पक्षाबद्दल निराळा विचार करण्याची फारशी जरूरी राहणार नाही. वास्तविक एकाचा विचार करतांना दुसऱ्याचा विचार अनुषंगाने करावा लागतो, अशी परिस्थिति असल्याचें दिसून येतें.

साहित्य आणि संगीत या दोन्ही ललितकला आहेत व ललितकलांचें उद्दिष्ट म्हणजे आनंद देणें हें होय व हा आनंद केव्हाहि रस-निर्मितीवरच अवलंबून असतो, यात संशय नाही. संगीतकला ही आपण विभक्त किंवा स्वतंत्र असल्याचा दावा सांगत असली, तरी उद्दिष्टाचें समान नातें विचारांत घेतलें असतां त्या दोघी बहिणी असल्याचेंच म्हणावें लागेल.

संगीताला स्वतंत्रपणा आहे, नाही असें नाही. तथापि तो कोणत्या अर्थाने व कोणत्या प्रकारच्या संगीताच्या बाबतींत, हा मुख्य प्रश्न असून त्याबद्दल थोडें स्पष्टीकरण करणें उचित आहे.

संगीताचे प्रकार तीन संभवतात:—[१] एक, केवळ स्वरप्रधान संगीत. [२] दुसरा प्रकार, तराण्यासारखें निरर्थक वर्णयुक्त संगीत. [३] तिसरा प्रकार म्हणजे, अर्थपूर्ण शब्दसहित संगीत.

वरील तीन प्रकारांपैकी पहिल्या व दुसऱ्या प्रकारच्या संगीतापासून आनंद होईल, अर्थात्, कांही प्रमाणांत रस-निर्मिति होईल. परंतु गायकाकडून चिजा-वगैरेंच्या द्वारें जें गायन केलें जातें, तें बहुतांशीं तिसऱ्या प्रकारचेंच म्हणजे अर्थपूर्ण शब्दसहितच असतें, हें कोणालाहि सहज कळण्यासारखें आहे. या तिसऱ्या प्रकारच्या संगीताचा साहित्याशीं अपरिहार्यपणें संबंध येतो, असें उघड दिसून येईल आणि उत्कट रसोत्कर्षाच्या दृष्टीने तिसऱ्या प्रकारचें संगीतच महत्त्वाचें व विशेष उपयुक्त ठरणार आहे.

'साहित्य' या शब्दाच्या अर्थाबद्दलहि थोडी स्पष्टता करावयास पाहिजे. गद्यरूप आणि पद्यरूप असें द्विविध साहित्य आहे. यांपैकी पद्यरूप साहित्याचाच संगीताशीं संबंध येतो व तोच 'साहित्य' या शब्दाचा अर्थ येथे अभिप्रेत समजावयाचा आहे.

संगीताच्या दृष्टीने पद्याची म्हणजे काव्याची दुसरी एक व्याख्या सुप्रसिध्द पाश्चिमात्य ग्रंथकार कार्लाईल याची येथे देण्यासारखी आहे. तो म्हणतो की, ' जें गानबध्द विचाराविष्करण, तें काव्य ' यावरून काव्य व संगीत यांचा नैसर्गिक संबंध कळून येईल.

संगीताचा साहित्याशीं संबंध येतो, तो पद्यांतील अर्थाच्या दृष्टीने व रसाच्या दृष्टीनेच होय. तसेंच, पद्यांतील मात्रा–गण पाहून त्या पद्याला कोणता ताल लावला पाहिजे, याचाहि गायकाला विचार करावा लागतो व पद्यांतील अर्थाला अनुरूप अशा रागांत तें पद्य गाणें उचित असतें. कोणतेंहि पद्य कोणत्याहि तालांत म्हणतां येतें, अशी कित्येक गायकांची समजूत आहे, ती चुकीचीच आहे. तसेंच, पद्यांतील अर्थ करुणरसपर असतां तें पद्य वीर रसाला उचित असणाऱ्या रागांत म्हटलें, तर सहृदयाला आनंद देणारें होणार नाही.

आता, उलट सांगावयाचें म्हणजे साहित्याचा संगीताशीं संबंध येतो, तो तालाच्या दृष्टीने व रसाच्या दृष्टीने होय. पद्य जर जाति–रचनेचें, अर्थात्, तालबद्ध असेल, तर तालाच्या गणाप्रमाणें पद्यांतील मात्रा–गणांची रचना ठेवावी लागते व पद्यांतील अर्थाला अनुसरून योग्य अशी गेय चाल किंवा राग निवडावा लागतो. ताल–मात्रा व अक्षर–मात्रा यांचा संबंध कसा आहे, तसेंच, पद्य तालांत सफाईने म्हणून दाखवितां आलें, तरी त्याची रचना शिथिल कशी असूं शकते, आणि शिथिल रचनेमुळे शब्दांच्या अर्थाचे हाल, शब्द–भंग–इत्यादि दोष कसे उद्भवतात, याची नीट कल्पना असावी लागते.

साहित्य व संगीत यांच्या अर्थाविषयीं इतका खुलासा लक्ष्यांत घेतला असतां फारसा वाद राहणारच नाही, असें वाटतें.

गायकाने गावयाचें तें जर त्याने अर्थपूर्ण पद्य घेऊन गायन केलें, तर त्यामुळे त्याला मोठी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गैरसोय होईल, असें मुळीच नाही. उलट, रसोत्कर्षाच्या दृष्टीने तें गायनच अधिक परिणामकारक होणें खास संभवनीय आहे, ही गोष्ट कोणालाहि सहज पटूं शकेल. गायन करतांना कांही तरी अक्षरें उच्चारासाठी व स्वर किंवा आलाप घेण्यास साधनीभूत म्हणून घ्यावींच लागतात. तेव्हा तीं अक्षरें तराण्यासारखीं निरर्थक घेण्यापेक्षा अर्थपूर्ण अक्षरें घेतलीं, तर कांहीच बिघडणार नाही; हें उघड आहे. निरर्थक अक्षरें घेऊन गायन करतां येतें व येईलहि, याबद्दल वाद नाही. आणि, त्या प्रकारच्या गायनाने रस-निर्मिति होईल, हेंहि खरें असलें, तरी तेंच गायन अर्थपूर्ण पद्याच्या योगें केलें, तर उद्दिष्ट रसाचा उत्कर्ष अधिक उत्कट व अधिक परिणामकारक होऊं शकेल. कारण पद्यांतील अर्थ-बोध होऊन त्यांतील भावनेचा श्रोत्यांच्या मनावर होणारा परिणाम हा रसोत्कर्षाला अधिक पोषक असेंच कार्य घडवून आणील. एखाद्या रागांतील तराणा ऐकावा आणि त्याच रागांतील एखादें अर्थपूर्ण पद्य त्याच गायकाने गाईलेलें ऐकावें. असा तुलनात्मक प्रयोग करून पाहिला असतां दोहोंमधील विशेष फरक कळून येणार आहे. आणि, साहित्य हें संगीताला कसें उपकारकच होतें, हें स्पष्ट होईल. गायनाने कर्णांची तृप्ति होईलच, पण पद्यामधील अर्थ-बोध झाल्यामुळे एकप्रकारें बुद्धीची तृप्ति अंशतः होण्यासारखी आहे. हा दोहोंमधला विशेष सांगतां येतो. भिन्न-भिन्न रसांच्या सूक्ष्म छटा दर्शविण्यास केवळ संगीत अपुरेंच पडतें. म्हणून संगीतास काव्याची जोड दिली, तर मात्र त्याच्या द्वारां वाटेल त्या रसाच्या सूक्ष्म छटा दाखवितां येतील.

यासाठी असें म्हणावेंसें वाटतें की, साहित्य आणि संगीत यांचा योग दुग्ध-शर्करा-मिश्रणासारखा अत्यंत गोड होतो, किंबहुना, हा दोन्हींचा योग दोन नद्यांच्या प्रीति-संगमासारखाच श्रेयस्कर व पुण्यकारक ठरणारा आहे. म्हणून गायकाने साहित्याकडे व साहित्यकाने किंवा कवीने संगीताकडे दुर्लक्ष्य करतां कामा नये व तुच्छता-बुद्धीहि बाळगूं नये, ही गोष्ट विशेष स्पष्ट करण्याची जरूरच नाही.

संगीत-शास्त्रांत गायकाचे अनेक गुण सांगितले आहेत, त्यांपैकी एक महत्त्वाचा गुण प्रस्तुत विषयाच्या दृष्टीने या ठिकाणीं उल्लेखनीय आहे. गायकाने स्पष्ट व योग्य वर्णोच्चार करावा आणि गीताचा अर्थ समजून घेऊन तदनुरोधाने चीज वठवावी, अशी त्याजवर शास्त्रानेच ज़बाबदारी टाकलेली आहे. त्यावरून विचार करतां शास्त्रकारांपुढे गावयाची चीज अर्थपूर्ण असावी, ही गोष्ट उघड दिसते. अर्थात् पद्याचा संबंध संगीतांमध्ये पूर्वाचार्यांनी गृहीत धरलेला आहे.

भारतीय आर्यांची दृष्टि, शास्त्र असो वा कला असो, आध्यात्मिक असते. शेवटी परमेश्वर-कारणीं त्या शास्त्राचा व कलेचा उपयोग व्हावा, ही मुख्य अपेक्षा असावयाचीच. या अपेक्षेने पाहावयाचें झाल्यास गाण्याचा उपयोग परमेश्वरचरणीं मनाची समाधि लागण्याकडे व्हावा, हीच संगीताची सार्थकथा ठरेल व हें संगीत भक्ति-भावनेला पोषक असणाऱ्या अभंगासारख्या अगर कबीर-मीराबाई यांच्या पदांसारख्या अर्थपूर्ण शब्दांतूनच प्रकट होणार. म्हणजे, याहि एका दृष्टीने साहित्य आणि संगीत यांचा संबंध आरंभीं म्हटल्याप्रमाणें बहिणी-बहिणीसारखाच ठरतो.

असो. आतापर्यंत जें विवेचन केलें, त्याचा थोडक्यांत सारांश सांगण्याचा झाल्यास तो प्रा. ना. सी. फडके यांच्या शब्दांमध्ये सांगतां येण्यासारखा आहे. प्रा. फडके म्हणतात कीः—

" ज्या स्वरांना शब्दांचें स्वरूप मुळींच दिलेलें नाही, असे स्वर गायकाने आपल्या कंठ-नलिकेंतून काढले, तर ते ऐकणाराला त्यामुळे आनंद होईल काय ? या प्रश्नाला " होईल "—असेंच उत्तर द्यावयास पाहिजे. मात्र त्या उत्तराला एक महत्त्वाची पुस्ती जोडली पाहिजे व ती ही की, एक तर अशा स्वर-श्रवणाने होणाऱ्या आनंदाला गायनाचा संपूर्ण आनंदच म्हणतां येणार नाही आणि दुसरें असे की, कंठांतून काढलेल्या या शब्दहीन स्वरांना 'गायन' असेंहि म्हणतां येणार नाही ××× अर्थपूर्ण व भावनामय कवितेची संगीताला गरज नाही, असें सिद्ध करतां येत नाही. "

• • •

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

लेखनाची तारीख ४ ऑगस्ट १९४७

१५ ऑगस्टचा मंगल दिन !

१५ ऑगस्ट रोजीं हिंदुस्थान ब्रिटनच्या गुलामगिरींतून जवळ जवळ मुक्त होत आहे आणि त्या प्रसंगानें त्या दिवशीं हिंदुस्थानांत महोत्सव साजरा होणार आहे. हिंदुस्थानची फाळणी झाल्याचें दुःख आपण विसरूं शकत नसलों, तथापि १५ ऑगस्ट रोजीं हिंदुस्थानच्या ‘इंडिया’ च्या राजकीय नभोवितानांत स्वातंत्र्याची अरुणप्रभा झळकणार आहे याचा आपण मनापासून आनंद मानला पाहिजे. गेल्या दीडशें वर्षांपासून हिंदुस्थानच्या मानगुटीस बसलेली ब्रिटिश सत्ता आणखी किती वर्षें तशीच कायम राहिली असती, याचा बिलकूल भरंवसा नव्हता ! यामुळे या सत्तेचें विसर्जन केव्हा होतें, याची आपण सर्वजण अधीरतेनें वाट पाहत होतों. अखेर गेल्या महायुद्धामुळे ब्रिटनला आपलें साम्राज्य पेलणें अशक्य होऊन भारतीयांच्या हातीं सत्तांतर करणें भाग पडलें आणि अशा रीतीनें १५ ऑगस्ट रोजीं आपण पूर्ण स्वातंत्र्याच्या उंबरठ्यांत प्रवेश करीत आहों. हा क्षण जवळ येण्यास कॉंग्रेस व तिचे गांधीजी-प्रभृति महनीय नेते यांचे परिश्रम अंशतः कारणीभूत झाले आहेत, हें सत्यहि कुणीच नाकारूं शकत नाही, हेंहि येथे नमूद करणें अवश्य आहे.—असा हा मंगल दिवस पाहण्याचें भाग्य आपणांस प्राप्त झालें आहे, याबद्दल वाटणारें समाधान व्यक्त केल्यावाचून राहवत नाही !

इतःपर हिंदुस्थान यावच्चंद्रदिवाकरौ स्वातंत्र्य-सौख्य अनुभवो, अशीच या प्रसंगीं सर्वांची कामना असणार !

वऱ्हाडांतील खळबळ !

१५ ऑगस्टनंतर वऱ्हाडचें भवितव्य कसें असणार, हा प्रश्न आजतागाईत तरी अनिर्णीतच राहिला आहे. हिंदुस्थान-सरकार व निजाम-सरकार यांच्या वाटाघाटी सुरू आहेत आणि १५ ऑगस्टपूर्वी कांही तरी निर्णय घेतला जाऊन तो घोषित करण्यांत येईल, अशी अपेक्षा आहे.

दरम्यान सर्वसामान्य जनतेंत खळबळ उडालेली आहे, ही वस्तुस्थिति झाकतां येत नाही. वऱ्हाडवर निजामाची स्वारी होण्याची संभाव्यता आता दिसत नाही, हें खरें; पण गुंडगिरी होते की काय, अशी जनतेला-सकारण वा अकारण-भीति वाटत आहे, हें मात्र निःसंशय ! यामुळे पुष्कळ लोक स्थलांतर करूं लागले आहेत. आणि, जो तो गुंडांचा उपद्रव कदाचित् झालाच, तर आत्मसंरक्षण कसें करावें, या चिंतेत मग्न झाला आहे ! समाधानाची गोष्ट अशी की, मध्यप्रांत-वऱ्हाडचें प्रांतिक सरकार शांततारक्षणाची शक्य तेवढी तरतूद करीत आहे व यामुळे सुबुद्ध लोकांस पुष्कळच दिलासा मिळालेला आहे.

अर्थात् वऱ्हाडांत सार्वजनिक शांततेस धक्का लागण्याजोगा कांहीहि प्रकार घडणार नाही, अशी आशा आपण करूं या.

लेखांतील मतांची जबाबदारी लेखकांवर !

‘युगवाणी’ त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मतांची जबाबदारी सर्वस्वी लेखकांकडे आहे, असें समजावें. तीं मतें संपादकास मान्य आहेत, असें मुळींच समजूं नये. ‘युगवाणी’ त हवीं तीं मतें मांडण्याचें लेखकांस पूर्ण स्वातंत्र्य आहे. यामुळे संपादकास मान्य न होणारीं कैक मतें ‘युगवाणी’ तील लेखांतून प्रगट होऊं शकतात.

‘युगवाणी’ त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील कित्येक ‘खास’ विधानांबद्दल प्रसंगोपात्त खुलासा करण्याचें स्वातंत्र्य खुद्द संपादकहि स्वतःसाठी राखून ठेवीत आहे, हें देखील या ठिकाणीं स्वच्छ सांगून टाकतों ! हीं ‘खास’ विधानें कोणत्या हेतूनें केलेलीं असतात, हें जाणते वाचक न सांगतांहि समजूं शकतात !

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'युगवाणी" (Yugawani) Regd. No. N 945

लहान मुलांकरितां

शक्तिवर्धक

डोंगरे यांचें

बालामृत

सर्वत्र मिळतें

द. ना. ठाकूर यांनी ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून 'युगवाणी' कार्यालय १९,४२५ मुधोळकर पेठ अमरावती, येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ